**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/४९०/०२**

**श्री.एल.एस.कोल्हे**
**मु.पो.ता.इंदिरापथ, कोपरगांव,**
**जि.अहमदनगर ४२३ ६०१.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.एल.एस.कोल्हे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता हजर राहू शकत नाही असे तक्रारदाराने दि.१८.०१.२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले. गैरतक्रारदार हजर होते सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१९.१०.२००८ व दि.२१.०७.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

श्री.बी.डी.सानप, आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका येथे कार्यरत असतांना MS-CIT परिक्षेत स्वत: ऐवजी Dummy विद्यार्थी परिक्षेला बसविला होता हे खरे आहे काय? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक माहिती विहित कालावधीत दिली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/२७२२/०२ व अपील क्र.२००९/३७९१/०२ दाखल केले होते. सदर अपीलावर सुनावणी आयोजित करुन दि.१५.०६.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले आहेत. सदर प्रकरणी तक्रारदारास ३०

दिवसाचे आत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे आयोगाचे आदेश आहेत. आयोगाच्या आदेशानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने क्र.४९०/०२ ही तक्रार आयोगाकडे दाखल केली. सदर तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने असे प्रतिपादन केले की, प्रस्तुत प्रकरणी आवश्यकती चौकशी करून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने स्वंयस्पष्ट अहवाल शासनास सादर केला. श्री.सानप हे भा.प्र.से. मधील अधिकारी असल्याने सामान्य प्रशासन विभाग हे सक्षम शिस्तभंग प्राधिकरण असल्याने, प्रकरण त्या विभागाकडे हंस्तांतरित करण्यात आलेले आहे. सदर बाब दि.१६.०१.२०१० च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविण्यात आली असल्याचे पत्राची प्रत आयोगास सादर करून प्रतिपादन केले. यावरून सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या दि.१५.०६.२००९ च्या आदेशाचे पालन केले आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**<br>**दिनांक १९.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०४७/०२**

**श्री.विजय एस.थोरात**
**अशोक नगर, आकोट ता.अकोट.,**
**जि.अकोला ४४४ १०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विजय थोरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०१.२००९ रोजी अर्ज करुन, पद रिक्त असतांनाही भुतपूर्व निवड मंडळ पुरस्कृत उमेदवारांना नियमानुसार सर्व फायदे देउन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलडाणा यांचेकडून नियुक्त्या मिळवून देण्यात शासनाला अद्याप यश का आले नाही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.०२.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१८.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल.

सदर अपीलावर दि.०४.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार

अमरावती येते उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

भूतपर्व निवड मंडळाच्या कक्षेतील प्रलंबित निवड प्रक्रिया आहे, त्या स्तरावर रद्द करण्याचा निर्णय शासनाने दि.०६.०८.२००३ अन्वये घेतला. पद भरतीसंदर्भात कार्यासनात कोणतीही कागदपत्र ठेवली जात नाहीत. कागदपत्रे त्या त्या नियुक्ती प्राधिका-याकडेच उपलब्ध होउ शकतात. दि.१९.१०.२००७ च्या शासन निर्णयाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली आहे असे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपीलावर आदेश पारित केले आहेत. यावरुन प्रादेशिक निवड मंडळाने शिफारस केलेल्या उमेदवारांस सामावून घेता येत नाही. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या दि.१८.०५.२००९ च्या आदेशात काही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०४५/०२**

**श्री.शामराव ना.धानोरकर**
**रुम नं.८, संजीवनी इमारत,**
**५ वा मजला, तेजसनगर, रेनॉल्ड रोड,**
**वडाळा (पू), मुंबई ४०० ०३७. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय अधिकारी**
**विभागीय अधिकारी, मोर्शी,**
**जि.अमरावती ४४४ ९०५.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार मोर्शी, तहसिल कार्यालय,**
**मोर्शी, जि.अमरावती ४४४ ९०५. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शामराव धानोरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०३.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.१२.२००५ रोजी अर्ज करुन, दि.०१.०४.१९७५ ते दि.३०.०४.१९७५ च्या कालावधीत मोर्शी तहसिल कार्यालयाने अनुसूचित जमातीची प्रमाणपत्र ज्या व्यक्तींना देण्यात आली आहेत त्यांची नावे देण्याची मागणी केली होती. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०८.०२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी अमरावती येथे उपस्थित होते. अपीलकार

मुंबई येथे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मोर्शी तहसिल कार्यालयाने निर्गमित केलेल्या (दि.०१.०४.१९७५ ते दि.३०.०४.१९७५) या कालावधीत ज्या व्यक्तांना अनुसूचित जमातीची प्रमाणपत्र निर्गमित केली त्यांची नावे मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेल्या माहिती संबंधाची कागदपत्र फार जूनी आहेत. सदर जुनी कागदपत्र शोध घेउनही सापडत नाहीत. त्यामुळे अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविता येत नाही असे उत्तरवादीने व्दितीय अपीलवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतीपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र शोध घेउनही सापडत नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी जाणीवपूर्वक निर्णय घेउन तसे अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०४८/०२**
**अपील क्र.२०१०/४०४९/०२**
**अपील क्र.२०१०/४०५०/०२**

**श्री.हरिश्चंद्र पवार**
**सी/१६, हुडको कॉलनी, मंगरुळपीर,**
**ता.मंगळूरपीर, जि.वाशिम. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हरिश्चंद्र पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०१.२००९ रोजी अर्ज करुन, दि.०१.०१.२००८ ते दि.३१.१२.२००८ च्या कालावधीत खालील ६ मुद्याची माहिती मागीतली होती.

१. महाराष्ट्रातील सर्व परवानाधारक घाउक केरोसीन डिलर्सची जिल्हा व तालुकानिहाय माहिती

२. प्रत्येकाला मंजूर झालेला मासिक कोटा व विक्री झालेला केरोसीन कोटा

३. घाउक केरोसीन डिलर्सना मंजूर झालेला खरेदी दर व विक्री दर

४. खर्च वगळता प्रत्येक घाउक विक्रेत्याला प्राप्त झालेला शासनमान्य मासिक नफा

५. शासनाकडून प्रत्येक घाउक केरोसीन विक्रेत्याकडून वसूल झालेली अनुज्ञप्ती फी

६. महाराष्ट्र राज्य प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुक्याला मंजूर केलेला केरोसीन कोटा

जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधी पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.०३.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१३.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी मुंबई येथे उपस्थित होते. अपीलकार अमरावती येथे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, राज्यातील केरोसीन परवानाधारक प्रत्येकाला मंजूर झालेला मासिक कोटा, विक्री, घाउक केरोसीन डिलर्सना मंजूर झालेला खरेदी दर व विक्री दर, घाउक विक्रत्यांना झालेला नफा, घाउक केरोसीन विक्रेत्याकडून वसूल झालेली अनुज्ञाप्ती फी व प्रत्येक ताल्युक्याला मंजूर झालेला केरोसीन कोटा अशाप्रकारची विस्तीर्ण माहितीची मागणी केली होती. संबंधीत माहिती अधिका-याकडे उपलब्ध असलेली माहितीच पुरविणे कायद्यानुसार अपेक्षीत आहे. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जिल्हा, तालुका व सर्व घाउक / अर्धघाउक / किरकोळ केरोसीन परवानाधारकाशी संबंधीत आहे. त्यामुळे सदर माहिती शासन स्तरावर उपलब्ध नाही. माहिती संकलीत करुन अपीलकारास उपलब्ध करुन देण्याची अधिनियमात तरतुद नाही. आवश्यक असलेली माहिती संबंधीत माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी लागेल असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी दि.२४.०१.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी दि.१३.०४.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०४४/०२**

**श्रीमती.रंजना दिगंबर राउत**
**रा.महात्मा फुले, मौजा कवडीपूरा,**
**पो.सुतगीरणी, ता.पुसद,**
**यवतमाळ ४४५ २१५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी. समोर,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी. समोर,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.रंजना राउत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी चौकशी अहवाल पाठविल्यानंतर अध्यक्ष, मानव अधिकार आयोग, मुंबई यांनी केलेल्या कार्यवाही अहवालाची छायांकित नक्कल मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१८.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकाराचे प्रतिनिधी हजर होते. अपीलकार मुंबई येथे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे प्रतिनिधी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मानवी हक्क आयेग यांनी पारित केलेल्या आदेशानुसार पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी स्वतंत्र विशेष पोलीस अधिकारी नियुक्त करुन ६ आठवडयात अहवाल सादर करण्याचे आदेश होते. पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचेकडून अहवाल अपीलकारास प्राप्त झाला. सदर पोलीस रिपोर्ट मानवी हक्क आयोगाने स्विकारला नाही. सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करण्याचा आयेगाचा मानस आहे. पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचेकडून मानवी हक्क आयोगास अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालावर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकाराने मागीतली आहे. सदर माहिती आयोगाने अद्याप अपीलकारास पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २२.०१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३४३७/०२**

**श्री.दिलीप एम.नानावटी**
**रत्ना, ३२, जयहिंद सोसा.,**
**एन.एस.रोड ११, जे.व्ही.पी.डी.स्कीम,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०४९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इ.प्र)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/प वार्ड, एल.व्ही. पाटकर मार्ग,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/प वार्ड, एल.व्ही. पाटकर मार्ग,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दिलीप नानावटी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०६.२००९ रोजी अर्ज करुन, इमारती विभागाकडे इमारत बांधकाम प्रस्तावासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.०६.०६.२००९ रेजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कार्यालयाच्या जवळ जवळ ८००० चौ.फु. जागेत स्वत:ची मालकीची इमारत बांधकाम प्रस्तावासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने अचुक सी.टी.सर्व्हे क्रमांक / गावाचे नाव संस्थेचे नाव इत्यादी माहिती दिलेली नाही. यामुळे नेमकी इमारत बांधकाम प्रस्तावा संबंधीची फाईल सापडत नाही. त्यामुळे अपीलकारास माहिती देता येत नाही. अचुक सी.टी.सर्व्हे क्रमांक, गावाचे नाव, इमारत बांधकाम प्रस्ताव फाईलचा क्रमांक द्यावा. अथवा कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राची / फाईलचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता यापूर्वीही अनुपस्थित होते. संबंधीत फाईलचे निरीक्षण करण्याची अपीलकारास संधी दिली होती. अपीलकाराने सदर संधीचा फायदा घेतला नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०५४/०२**

**श्री.चेतन कोठारी**
**५२, आसेनिक अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबाली पटेल लेन ऑफ,**
**बी.देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधिक्षक,**
**जि.सातारा.**

**जन माहिती अधिकारी तथा उप पोलीस अधिक्षक,**
**जि.सातारा.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चेतन कोठारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००८ रोजी अर्ज करुन, द्रुतगती मार्गावर विशेषत: जि.सातारा (महाबळेश्वर आणि पायगणी) येथे हेलमेट शिवाय दुचाकी वाहने चालविणा-या किती दुचाकी वाहन चालकांना पकाडण्यात आले. त्यांचेकडून एकूण किती दंड गोळा करण्यात आला. किती दुचाकी चालकाचे परवाना जप्त करुन रद्द करण्यात आले. सदर कारवाई कोणत्या अधिनियम कलमानुसार करण्यात आली. इंग्रजी भाषेशिवाय इतर भाषेत वाहनावर नंबरप्लेट लावल्यास किती शास्ती लादण्यात येते इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराचा अर्ज पोलीस उप अधिक्षक (गृह) यांच्या नावाने अग्रेषित केला असल्याने सदरचा अर्ज पोलीस अधिक्षक सातारा यांचेकडे पुढील आवश्यक कारवाईकरिता उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.एस.एम.शिंदे यांनी दि.२६.११.२००८ च्या पत्रान्वये हस्तांतरित केला व तसे अपीलकारास अवगत केले. अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज प्राप्त झाला आहे. माहिती पुरविण्यास १० दिवस मुदत वाढवून द्यावी अशी माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.१२.२००८ च्या पत्रान्वये

कळविले.  यानंतर माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.  अपीलकार उपस्थित नव्हते.  सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जि.सातारा द्रुतगती मार्गावर हेल्मेट शिवाय दुचाकी वाहने चालविणा-या दुचाकी वाहन चालकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  आयोगासमोरील व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने असे प्रतिपादन केले की, मागणीनुसार अपीलकारास माहिती पुरविण्यात आली.  व्दितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलकाराची अनुपस्थिती लक्षात घेता तसेच अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीचे प्रतिपादन लक्षात घेता मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०५३/०२**

**डॉ.कमलाकर बागल**
**साई प्रसाद सोसा.,**
**सिंग इस्टेट, रोड नं.२,**
**बसरा स्टुडिओ समोर,**
**कादिवली (पू), मुंबई ४०० १०१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी**
**पंचायत समिती, खटाव, ता.खटाव,**
**जि.सातारा ४१५ ५०६.**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत येरळवाडी, ता.खटाव**
**जि.सातारा. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार डॉ.कमलाकर बागल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०९.२००८ रोजी अर्ज करुन, विविध लेखाशिर्ष आणि योजनाकरिता येरळवाडी ग्रामपंचायतीकरिता एकूण किती निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबत अनुषंगीक ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे संकलनाचे काम चालू आहे. माहिती संकलीत होताच अपीलकारास टपालव्दारे माहिती पुरविण्यात येईल असे उत्तरवादीने अपीलकारास दि.१५.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ग्रामपंचायत येरळवाड, ता.खटाव जि.सातारा या ग्रामपंचायतीस विविध लेखाशिर्षाखाली विविध योजनाकरिता एकूण किती निधी प्राप्त झाला याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. उत्तरवादीने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. म्हणून उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु का? करण्यात येउ नये याबाबत १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८५/०२**

**श्री.पांडूरंग दिक्षित**
**२७७७, रामेश्वर निवास,**
**इनामदारवाडा, जुनी माळी गल्ली मंडई मागे,**
**पंढरपूर ४१३ ३०४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग, (ल-१),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग, (ल-१),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक,**
**भूमि अभिलेख, पुणे विभाग,**
**पुणे.**

**जन माहिती अधिकारी,**
**भूमि अभिलेख, पुणे विभाग,**
**पुणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.पांडुरंग दिक्षित यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, दि.११ जुलै, २००८ तसेच दि.०५ जुलै, २००९ च्या पत्रातील मुद्यावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची मागणी केली होती. सदर पत्राच्या प्रती, उप संचालक भूमि अभिलेख पुणे विभाग, पुणे यांचेकडे दि.०३.०८.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी पाठविली. सदर प्रकरणी अधिनस्त कार्यालयाकडून अहवाल प्राप्त करुन

अभिप्रायासह अपीलकारास पाठवावी अशा जन माहिती अधिका-यांनी उप संचालकांना सूचना दिल्या होत्या. उप संचालकांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने सादर केलेल्या पत्राच्या प्रती उप संचालक भूमी अभिलेख यांचेकडे पाठविण्याच्या उत्तरवादीस सूचना दिल्या. उत्तरवादीने पत्राच्या प्रती उप संचालकाकडे पाठविल्या. परंतू उप संचालकांनी माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.१४.०७.२००८ व दि.०५.०७.२००९ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवासाचे आत उप संचालक, भूमि अभिलेख, पुणे विभाग पुणे यांनी पाठविलेल्या अहवालाची प्रत अपीलकारास पाठवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९१/०२**

**श्रीमती.सोनल अमित शहा**
**चंपकलाल गांधी,**
**बिल्डींग नं.६ विंग सी १० वा मजला,**
**प्लॅट नं.१००४, दामोदर पार्क,**
**एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (प),**
**मुंबई ४०० ०८६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विक्रीकर कार्यालय, पुणे क्षेत्र,**
**विक्रीकर भवन, ३ रा मजला,**
**येरवडा, पुणे ४११ ००६.**

**जन माहिती अधिकारी,**
**विक्रीकर कार्यालय, पुणे क्षेत्र,**
**विक्रीकर भवन, ३ रा मजला,**
**येरवडा, पुणे ४११ ००६.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.सोनल शहा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०१.२००७ रोजी अर्ज करुन, मेसर्स पारस ॲटो एजन्सीज यांचे बध्दल ०५-०६, ०६.०७, ०७-०८ यावर्षीची कर भरण्यासंबंधी माहिती, व्यवसायकरासंबंधी ०५-०६ ते ०७-०८ ची भागीदारीची व कामगारांची माहिती, सन २००१ ते २००७-०८ विवरणपत्रके व ट्रेडिंग ॲण्ड प्रॉफीट ॲण्ड लॉस अकोंटस् बध्दलची माहिती मागीतली होती. मेसर्स पारस ॲटो एजन्सी यांनी त्यांचे पत्र दिनांक २३.०१.२००९ अन्वये सदर माहिती अपीलकारास देता येत नाही असे कळविले असल्यामुळे मागणी केलेली माहिती अपीलकारास देण्यात येउ नये असे कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१०.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मेसर्स पारस ॲटो एजन्सीज बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतली होती. त्रयस्थ पक्षाची माहिती पुरविण्यापूर्वी उक्त अधिनियमातील कलम ११ अनुसार संम्मती घेणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यास त्रयस्थ पक्षाने हरकत घेतली असल्याने, माहिती प्रकट करण्यामागे व्यापक लोकहित असल्याचे दिसून येत नसल्याने, अपीलकारास माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त व्हॅट प्रशासन, पुणे यांनी दि.२९.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२०.०४.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८८/०२**

**श्री.शैलेश संाघवी**
**शॉप नं.१, धुतपापेश्वर,**
**मंगलवाडी, जे.एस.एस.रोड,**
**मुंबई ४४० ००४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**विधान भवन, पुणे विभाग,**
**(सामान्य प्रशासन विभाग),**
**पुणे ४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**विधान भवन, पुणे विभाग,**
**(सामान्य प्रशासन विभाग),**
**पुणे ४११ ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शैलेश सांघवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०३.२००९ रोजी अर्ज करुन, मतदाराचे ओळखपत्र तयार करणा-या एजन्सीची सन २००१ ते मार्च २००८ या कालावधीतील देयके आदा केली नाहीत म्हणून विभागीय आयुक्त पुणे, विभाग पुणे कार्यालयाकडे किती अपील दाखल झाले आहेत, किती अपील निकालात काढले, किती अपील प्रलंबित आहेत याची वर्षनिहाय माहिती, देयके आदा केले नाहीत म्हणून दाखल होणा-या अपील / तक्रारीची सरासरी किती कालावधीत निकाली काढण्यात येतात इत्यादी एकूण १२ मुद्यावर माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०९.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. अपीलकार यांचे काहीही म्हणने नाही म्हणून दि.१५.०६.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मतदाराचे ओळखपत्र तयार करणा-या एजन्सीची प्रलंबित देयके अदा करण्यासंदर्भात अनुषंगीक एकूण १२ मुद्यावर माहिती मागीतली होती. मतदाराची ओळखपत्र तयार करणा-या व्यक्तीपैकी अपीलकार एक होते. सदर प्रकरणी अपीलकाराचा अर्ज, जिल्हा उप निवडणूक अधिकारी कार्यालय सांगली यांचेकडे आवश्यक कार्यवाहीकरिता पाठविण्यात आला. अपीलकाराचे बिल देउन टाकले (Claim Settled) असे उत्तदवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८९/०२**

**श्री.गोपीनाथ अवसरे**
**१/४९, ठोकरशी जिवराज बिल्डींग,**
**ठोकरशी जिवराज रोड,**
**शिवडी, मुंबई ४०० ०१५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, हवेली**
**ता.हवेली, जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, हवेली**
**ता.हवेली, जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.गोपीनाथ अवसरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.११.२००८ रोजी अर्ज करुन, १) नमुना १४ ची सन २००७-२००८ व २००८-२००९ ची प्रत, २) शाळेची अनधिकृत नोंद कोणत्या कागदपत्राच्या आधारे करण्यात आली आहे. त्या कामदपत्राच्या सत्यप्रती अथवा याबाबत जन माहिती अधिका-याकडे असलेल्या पुराव्याची प्रत किंवा तशी नोंद घेण्याबाबत महसूल अधिकारी यांनी अपीलकारास दिलेल्या आदेशाची प्रत ३) शाळेच्या अनधिकृत नोंदीच्या आक्षेपाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची प्रत, तसेच वादगृस्त प्रकरणाच्या नोंद वहित करण्यात आलेल्या तपशिलाची प्रत इत्यादी सन १९९० ते २००८ या कालावधीची माहिती मागीतली होती. आवश्यकती माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०५.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शाळेच्या अनाधीकृत नोंदीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९३/०२**

**श्री.नामदेव भागूजी तातळे**
**गुरूकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**आनंदगड, पार्कसाईट विक्रोळी,**
**मुंबई ४०० ०७९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ग्रामसेवक**
**फदालेवाडी/उगलेवाडी, मु.पो.शिनोली,**
**ता.आबेगांव, जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी,**
**फदालेवाडी/उगलेवाडी, मु.पो.शिनोली,**
**ता.आबेगांव, जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.नामदेव तातळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०८.२००८ व दि.१८.१२.२००८ रोजी अर्ज करुन, महात्मा गांधी तंटामुक्ती गाव समिती, तंटा मिटविण्यासाठी दंड म्हणून रुपये घेतले आहेत. त्या सदंर्भात सत्य सविस्तर माहिती, तक्रारदार यांच्याकडून दंड म्हणून रुपये घेण्यासाठी ग्रामसभेने मान्यता देण्यात आली आहे काय? याबाबत अनुषंगीक एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२४.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महात्मा गांधी तंटामुक्ती गाव समितीने वसूल केलेली दंडाची रक्कम, गावास मिळालेले एक लाखाचे बक्षीस याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली एकूण ६ मुद्यावरची माहिती अपीलकारास पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पोच देय डाकेने निशुल्करित्या पुरवावी. सदर कारवाई हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत करावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९४/०२**

**श्री.सुनिलकुमार बावधनकर**
**चोपडे एजन्सीस ॲण्ड कन्सल्टसीज,**
**हिरामण बांडे बिल्डींग, मुंबई पुणे रोड,**
**कासारवाडी, पुणे ३४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसुल विभाग, (महसुल मंत्री),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसुल विभाग, (महसुल मंत्री),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने दि.०४.१२.२००७ रोजी आणि श्री.प्रभू विश्वनाथ चोपडे यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईचा तपशिल, तसेच चौकशी दरम्यान संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा, संबंधीत घटकाचे घेतलेले जबाब, पिडीत घटकास दिलेला न्याय, दोषी घटकावर झालेली दंडात्मक कारवाई याबाबतच्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. योग्य पूर्ण माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी योग्य पूर्ण माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने अतिक्रमण काढून टाकण्याबाबत जन माहिती अधिका-याकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अतिक्रमण काढून टाकण्याची बाब जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यकक्षेतातील असल्याने अपीलकाराची तक्रार पुढील आवश्यक कारवाईकरिता जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९६/०२**

**श्रीमती. गौरी मेजीरी**
**बी-२०६/२, सरकारी कॉलनी,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहकार आयुक्त पुणे यांचे कार्यालय,**
**सेंट्रल इमारत, पुणे ४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकार आयुक्त पुणे यांचे कार्यालय,**
**सेंट्रल इमारत, पुणे ४११ ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती.गौरी मेजारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०७.२००८ रोजी अर्ज करुन, सनदी - लेखापालांची सन २००७-०८ करिता यादी, त्यांना वाटप केलेल्या बँका व बँकाचे दि.२१.०३.२००७ पर्यंत खेळते भांडवल, तसेच सनदी लेखापालांना बँका वाटप करण्याविषयी मार्गदर्शन सूचना याबाबतची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०८.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सनदी लेखापाल, वाटप केलेल्या बँका, बँकाचे खेळते भांडवल इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी एकूण ६२ पृष्ठ, एकूण रु.१७४/- शुल्क घेउन पोच देय डाकेने माहिती पाठविली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. सदर प्रकरणी अपीलकारास उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४१०१/०२**

**श्री. महेंद्र कारा**
**भिमजी कारा बेग,**
**चंदावरकर रोड,**
**बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधिक्षक**
**ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय,**
**चव्हाननगर पाषाण, पुणे ४११ ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी**
**लोणावळा विभाग, जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.महेंद्र कारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०४.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०१.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने केलेल्या तक्रारीनुसार दाखल करण्यात आलेल्या FRI No.००/६, २००७, IPC/३८१/३४ बाबतच्या पोलीस नोंदवहिच्या पानाची छायाप्रत, चौकशी संबंधी सविस्तर अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१५.०३.२००७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळ्ले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोलीस नोंदवहीच्या संबंधीत पानाच्या छायाप्रती, चौकशी संबंधीची सविस्तर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी दोषारोपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकारास सदर प्रकरणाची सद्यस्थिती, मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले असल्याबाबतची माहिती अपीलकारास कळवावी.

**आदेश**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९२/०२**

**श्री. गणपत सहदेव पांडलोसकर**
**८/३०८ रंग रेखा को.ऑ.हौ.सोसा.,**
**शैलेंद्रनगर, एस.व्ही.रोड,**
**दहिसर (पू), मुंबई ४०० ०६८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी**
**नगरपरिषद पंढरपूर,**
**पंढरपूर, जि.सोल्हापूर.**

**जन माहिती अधिकारी तथा आरोग्यधिकारी**
**नगरपरिषद पंढरपूर,**
**पंढरपूर, जि.सोल्हापूर. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गणपत पांडलोसकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, पंढरपूर नगरपरिषदेच्या स्वच्छता वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समितीने नवीन मुतारी व कचराकुंडी बांधण्यासाठी पर्यायी जागा निश्चित करुन त्या जागेवर बांधकाम झाल्यावर जळोजी महाराज मठा समोरील मुतारी व कचरापेटी हलविली जाईल असा नगरपरिषदेने ठरावा क्र.११५, दि.२४.०९.२००१ रोजी सम्मत केला. ठरावाची अमंलबजावणी होत नसल्याबाबत अनुषंगीक एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०३.१२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने, माहिती अपूरी, असमाधानकारक असल्याने अपीलकाराने दि.२३.१२.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद पंढरपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१६.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलार्थी यांना

वस्तुस्थितीवर जन माहिती अधिका-यांनी माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिका-यांनी सदर ठिकाणी दिवसातून दोन वेळा स्वच्छता करावी. घाणीबाबत आवश्यकती जंतुनाशके फवारणी वेळोवेळी करावी असे नमुद करुन दि.२२.०१.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील खारीस केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मठा समोरील मुतारी व कचरापेटी अन्यत्र हलविण्याबाबत नगरपरिषदेने काय काय कार्यवाही केली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मुतारी व कचराकुंडीकरिता नवीन पर्यायी जागा प्राप्त झाल्यानंतर मठा समोरील कचराकुंडी व मुतारी काढून टाकण्यात येईल अशी अपीलकारास उत्तरवादीने माहिती दिली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९८/०२**

**श्री.बिराजदार अप्पासाहेब विठ्ठल**
**ग.ह.झोपडपट्टी नं.०१,**
**मारुती मंदीर जवळ, भोलेनाथ स्टोअर्स,**
**बिजापूर रोड, सोलापूर ४१३ ००४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.बिराजदार विठ्ठल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०५.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

केंद्र पुरस्कृत योजनेनुसार राज्यात सूरु असलेल्या २६२ केंद्रीय आश्रमशाळा संबंधीत राज्य सरकारचे धोरण काय? हया आश्रमशाळांना शासनाची मान्यता असून त्यास आजपर्यंत अनुदान का देण्यात आले नाही? हया आश्रमशाळा संदर्भात प्रशासकीय व अन्य बाबतीत पूर्ण नियंत्रण कोण करते? हया आश्रमशाळामध्ये शिकणा-या अनु.जातीच्या हजारो विद्यार्थ्या, कर्मचा-यांच्या भवितव्याविषयी शासनाने कोणते निर्णय घेतले? नसेल तर का नाही घेतले? केंद्र किंवा राज्य शासन त्या शाळांना अनुदारन देणार की नाही? नसेल तर का देउ शकत नाही? हया योजनेचे उत्तरदायित्व कोणावर आहे?

अर्जास रु.१०/- कोर्ट फी स्टॅम्प, डिमांड ड्राफ्ट, बँकर्स चेक अथवा रोखीने भरुन पावती जोडणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे अपीलकार दारिद्रय रेषेखालील असल्याचे अर्जामध्ये नमुद केले आहे. त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. फक्त अर्जासोबत रेशनिंग कार्डची झेरॉक्सप्रत जोडली आहे. अपीलकाराने तस पुरावा सादर केल्यास अर्जावर पुढील कारवाई करण्यात येईल असे अपीलकारास दि.२१.०५.२००८ च्या पत्रान्वये उत्तरवादीने कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दि.१८.०६.२००८ रोजी दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराच्या प्रतिनिधीचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांना अनुदान मिळणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८१/०२**

**श्री. ॲड.धनंजय गोविंदराव पाटील**
**वाघमारे पाटील निवास,**
**मुख्य पोस्ट ऑफिस जवळ,**
**गांधी चौक लातूर ता.जि.लातूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ॲड. धनंजय पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. माहिती आयोग व त्याची खंडपिठे यांनी केंद्रीय माहिती कायदा अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत आपल्या विभागाच्या किती अधिका-यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी म्हणून शिफारस केली. त्या संदर्भातील आयोगाचे सर्व निकाल व आयेगाचा पत्र व्यवहार.
२. सर्व खंडपिठाच्या आयोगानुसार किती अधिका-यावर कार्यवाही प्रस्तावित केली त्या संदर्भातील आदेश.
३. किती अधिका-यावर कार्यवाही न करण्याचा निर्णय घेतला त्या संदर्भातील मंत्रालयीन/आयुक्त कार्यालयाची टिपण्णी.

४. किती अधिका-या संदर्भात आजपर्यंत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.  त्या संदर्भातील अधिका-यांची यादी.

५. ४५ दिवसांपेक्षा जास्त दिवस होउनही कोणताही निर्णय न झालेल्या प्रकरणात कार्यालयीन कामकाजासंदर्भातील कायद्याप्रमाणे कार्यवाहीस जबाबदार कोण?

अर्जातील मुध्दा क्र.५ बाबत सा.प्र.वि. च्या सक्षम प्राधिका-याकडे स्वतंत्रपणे अर्ज करावा, मुध्दा क्र.१, २ व ३ संदर्भातील माहितीपोटी टपाल खर्चासह रू.६०/- शासकीय कोषागारात जमा करावी.  त्याची पावती शासनास सादर केल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अमंलबजावणी सुरु झाल्यापासून किती अधिका-यावर शिस्तभंगाची कारवाई करावी म्हणून शिफारस केली इत्यादी अनुषंगीक एकूण ५ मुद्याबाबत माहिती मागीतली होती.  सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन आयोगासमोर प्रतिपादन केले.  या प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २७.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८६/०२**

**श्री. संदीप भगवानराव काळे**
**४८९, समर्थकृपा, एन-१, एफ,**
**गरवारे स्टेडिअम मागे, सिडको,**
**औरंगाबाद ४३१ ००३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**३, महानगरपालिका मार्ग,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**३, महानगरपालिका मार्ग,**
**मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संदीप काळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०८.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. आपल्या विभागातून जाहीराती वितरित करतांना निकष कोणते वापरले जाते.
२. जाहीरात वितरण करतांना शासनाच्या कोणल्या निर्णयाचे पालन केले जाते.
३. जाहीरात वितरण करतांना आपले विभाग जाहीरात वितरण करते का? किंवा कोणत्या खासगी संस्थेमार्फत वितरित करण्यात येते?

४. खाजगी संस्थेमार्फत जाहीरात वितरीत करत असल्यास तशी परवानगी घेतली आहे का? यासाठी कोणत्या शासननिर्णयाचा किंवा परिपत्रकाचा आधार घेतला आहे. त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती देणे.

५. आपल्या विभागाच्या जाहीराती मिळाव्या यासाठी गेल्या ५ वर्षांत किती वर्तमानत्रांनी आपल्याकडे मागणी केली आहे. त्यावर वर्तमानपत्रांची नावे.

६. ५ वर्षांमध्ये कोणत्या वर्तमानपत्रांना जाहीरात दिल्या. जाहीरात वितरित करतांना रोस्टर ठेवले जाते का? याचा ५ वर्षांचा तपशिल क्रमवारीत देणे.

७. राज्यातील कोणकोणत्या वर्तमानपत्रांना आपण जाहिरात देता? त्यासाठाचे निकष काय?

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित वेळेत दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१८.०९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तंत्रशिक्षण संचालनालयाकडून वितरित करण्यात येणा-या जाहिरातीबाबत अनुषंगीक एकूण ७ मुद्यावर दि.०४.०८.२००९ च्या अर्जानुसार माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. उत्तरवादीने माहिती ११ दिवस उशिराने अपीलकारास पुरविली असल्याचे अपीलकाराने व्दितीय अपीलवरील सुनावणीचेवळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उत्तरवादीने अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली. याकरिता उत्तरवादीस जबाबदार धरुन उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार उत्तरवादीविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु का? करण्यात

येउ नये याबाबत आयोगाकडे जन माहिती अधिका-यांनी लेखी खुलासा चार आठवडयाच्या आत सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८७/०२**

**श्री.दवंगे नागेश यादवराव**
**रा.बेट. कोपरगांव, ता.कोपरगांव,**
**जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह परिवहन आयुक्त (परिवहन)**
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**४ था मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा परिवहन उप आयुक्त (प्रशासन)**
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**४ था मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.दवंगे नागेश यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. मा.ए.डी.येवला साहेब, नाशिक परिवहन अधिकारी साहेब यांची माहिती.
२. मा.ए.डी. येवला साहेब हे श्रीरामपूर येथे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी असताना त्यांचेवर लाचलुजपत अधिकारी यांनी धाड टाकून त्याचेवर काय कार्यवाही झाली त्याबाबत सविस्त माहिती.
३. मा.ए.डी.येवला यांची अहमदनगर या ठिकाणी बदली या ठिकाणी किती दिवस कार्यभार सांभाळला या बाबत सविस्त माहिती.

४. अहमदनगर येथून त्याची बदली धुळे येथे झाली धुळे येथे ही त्याचेवर लाचलुजपत अधिका-यांनी धाड टाकली? त्याचेवर काय कार्यवाही झाली याबाबत सविस्तर माहिती.

५. धुळे येथून त्यांची बदली अमरावती येथे झाली. या ठिकाणी ते बदली झाल्यानंतर किती महिन्यानी हजर झाले याबाबत सविस्तर माहिती.

६. मा.ए.डी.येवला यांचेवर दोन ठिकाणी लाचलुजपत अधिका-यांनी धाडी टाकल्या तर त्यांचे प्रमोशन कसे झाले या बाबत सविस्तर माहिती.

अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र. क व ई बाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०७.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. अर्जातील ब, ड आणि फ बाबत शासनाशी संबंधीत असल्यामुळे शासनाकडून विहित पध्दतीने माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२१.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेली माहिती योग्य असल्याचे नमूद करुन आदेश पारित केले. प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ए.डी.येथले, नाशिक परिवहन अधिकारी यांचेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली आहे. श्री.येवले यांचे संबंधीची फाईल शासनाकडे असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता

विहित पध्दतीचा अवलंब करुन अपीलकाराने शासनाकडे माहिती मागणे आवश्यक असल्याचे सांगीतले.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८५/०२**

**श्री.शेख नजिर (मुन्नाभाई)**
**११५८/६०, नांदगांवरोड, येवला**
**ता.येवला, जि.नाशिक.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता व शाखा अभियंता**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शेख नजिर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता यांनी महाराष्ट्र नागरीसेवा (वर्तणुक) नियम १९७९ चे कलम १९ चे पोटकलम १, २, ३, ४ व ५ नुसार विहित नमुन्यात मालमत्तेच्या संबंधात विवरणपत्रे सादर केलेली आहेत काय? त्याच्या छायाप्रतीची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र.१ व २ वरळी, उप विभाग दादर, उप विभाग परेल, व्यवस्थापक विकास विभाग चाळी वरळी या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असल्याने अर्जाची प्रत संबंधीताकडे हस्तांतरित केली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-याने दि.३१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. सुनावणी घेतली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंत्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.११.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. माहिती प्राप्त झाली असल्याबाबत लेखी पोच अपीलकाराने उत्तरवादीला दि.११.११.२००९ रोजी दिली. सदर पोच पावती उत्तरवादीने सुनावणीचेवेळी आयेगाच्या निदर्शनास आणली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५०६/०२**

**श्री.शशिकांत प्रभू**
**बी/२३, उद्यान प्रभा, तेजपाल स्किम,**
**रोड नं.२, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.वास्तुशास्त्रज्ञ**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**कक्ष क्र.४६९, तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार डॉ.शशिकांत प्रभू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन म्हाडा संस्थेच्या इमारतीचा पुर्नविकास करण्याकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता दि.१९.०५.२००९ च्या पत्रान्वये साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने अपील क्र.२००९/३२९३/०२ दाखल केले होते. तक्रारदारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरवावी. तक्रारदारास आवश्यक असलेले कार्यालयात उपलब्ध होत नसलेल्या कागदपत्राबाबत पुन्हा गैरतक्रारदाराने संबंधीत फाईलची तपासणी करुन कागदपत्र उपलब्ध आहेत किंवा नाही याची खात्री करावी व अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी

असे दि.२४.०९.२००९ रोजी आदेश दिले होते.  त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे क्र.५०६/०२ ही तक्रार दाखल केली.

ना हरकत प्रमाणपत्रासाठी लागणा-या कागदपत्राच्या यादीतील मुध्दा क्र.५ व १२ बाबतची माहिती तक्रारदारास पूर्वीच पुरविली आहे.  म्हाडा संस्थेच्या इमारतीच्या संबंधीत फाईल मध्ये ना हरकत प्रमाणपत्रासाठी लागणा-या कागदपत्राच्या यादीतील अ.क्र.३, ४, १०, ११, १२ व १३ वर नमुद करण्यात आलेली कागदपत्रे संस्थेने गैरतक्रारदाराच्या कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत. त्यामुळे सदरची माहिती कार्यालयाच्या अभिलेखावर नसल्याने ती पुरविता येत नाही.  असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१७.११.२००९ च्या पत्रान्वये कळविले.  आहे.  यावरुन असे दिसून येते की, गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२७८/०२**

**श्री.सुरेंद्र केशव धांडे**
**सितामाई भुवन, रिंग रोड,**
**सुभागवाडी, प्लॉट नं.१,**
**जळगांव ४२५ ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,**
**१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,**
**१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुरेंद्र धांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०६.२००८ अर्ज करुन, १) पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे दि.०१.०१.२००६ पासून मंडळाचे सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांचे सेवा काळातील सुधारित वेतनाप्रमाणे वेळोवेळी वाढलेला महागाई भत्ता इत्यादी कधी मिळणार २) रु.७, २९, २६, ८४६/- रक्कम मंडळास कोणत्या तारखेस प्राप्त झाली. त्याचा विनियोग काय केला. विनियोग केला नसल्यास महाराष्ट्र शासनाला रु.७, २९, २६, ८४६/- मंडळाचे परत पाठविले काय? अपीलकाराच्या पेन्शन खात्यात फरकाची रक्कम का पाठविली नाही इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

अपीलकार दि.३०.११.२००४ रोजी सेवानिवृत्त झाले. पेन्शन विभागाने दि.०१.१२.२००४ पासून आज अखेर पेन्शच्या ज्या रक्कमा देय होतात त्या अपीलकारास दिलेल्या आहेत. आता काही पेन्शनचा फरक देय नाही.

दि.०१.१२.२००४ पासून पेन्शन रू.२५५५-(-) ८५१=१७०४/- पेन्शन होती. अंशराशीकरण रू.८५१/- वजा करून १७०४/- प्रमाणे ०१.०३.२००५ पासून पेन्शन चालू केली आणि त्याचप्रमाणे सेवा उपदान ८५, ५००/- अंशराशीकरण रू.१, ०६, ८१८/- दि.०१.१२.२००४ ते दि.२४.०२.२००५ करिता सेवा निवृत्ती वेतन ११, ८८०/- अशी सर्व मिळून रू.२, ०४, १९८/- अपीलकारास दि.३१.०३.२००५ रोजी पाठविण्यांत आली.

तसेच ५०% डी.अे. मर्ज करून वरील कालावधीच्या दि.०१.१२.२००४ पासून फरकाच्या रक्कमाही दिल्या आहेत. सेवा उपदान फरक रू.४२, ७५०/- अंशराशीकरण फरक रू.५३, ४७१/- आणि दि.०१.१२.२००४ ते दि.३१.१०.२००७ मधील सेवानिवृत्ती फरक रू.८, ०७२/- अशी सर्व मिळून एकूण रक्कम रू.१, ०४, २२९३/- अपीलकारास दि.३०.१०.२००७ रोजी पाठविली असून सुधारित दर ५०% डी.अे. मर्ज करून आज रोजी रू.३, ८३२/- (-) / २७७/-= २५५५/- प्रमाणे पेन्श चालू आहे म्हणजे २५५५+३५% डी.अे. १४ १३४१/- = ३, ८९६/- दरमहा सध्या पेन्शन चालू आहे.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर आदेश पारित केले नव्हते. त्यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील क्र.१९४८ दाखल केले होते. प्रथम अपीलावर सुनावणी घेउन आदेश पारित करावेत असे नमुद करून अपीलकाराचे व्दितीय अपील Remand केले होते. त्यानुसार प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. दि.०१.०१.२००६ ते दि.३१.०४.२००४ पर्यंतचे (१९ महिने) सुधारित वेतनाचे विवरणपत्राची छायाप्रत दिली. अर्जातील मुध्दा क्र.२ ची माहिती दि.०३.०७.२००९ च्या पत्रासोबत अपीलकारास दिली. तत्पूर्वी अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन फरकाची रक्कम मिळण्याबाबत मागणी केली होती. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. उत्तरवादीने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, अपीलकाराचे सर्व सेवानिवृत्ती लाभ आदा करण्यात आले आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी दि.२०.०१.२०१० पासून ३० दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन अपीलकाराचे म्हणने ऐकून घ्यावे व आवश्यक ते आदेश पारित करावेत.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८८/०२**

**श्री.दादा गुलाब देशमुख**
**लोणी खुर्द. ता.राहाता. जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता**
**कार्य अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाख्रा शहर विभाग, सा.बां. विभाग,**
**विकास विभाग इमारत, ३ रा मजला, जुने जकात घर,**
**मुंबई ४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी,**
**कार्य अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाख्रा शहर विभाग, सा.बां. विभाग,**
**विकास विभाग इमारत, ३ रा मजला, जुने जकात घर,**
**मुंबई ४०० ०२३. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दादा गुलाब देशमुख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०८.२००९ अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. कार्यकारी अभियंता यांच्या दैनदिनीची छायाकिंत प्रती.
२. आपल्या याविभागात झालेल्या कामांची पाहाणी कोणकोणत्या वरिष्ठ अधिका-यांनी केली ? त्यांचे नावे, पदे आणि पाहणी केल्याचा दिनांक, महिना, वर्ष आणि वरिष्ठांनी कामात काय, काय चुका, दोष काढले त्याची निरीक्षण टिप्पणीची छायांकित प्रत.

३. आपल्या विभागाने ज्या, ज्या कामांचे बिले अदा केलीत त्या कामांना कार्यकारी अभियंता यांनी कोणकोणत्या तारखेंना भेटी देवून कामात काय, काय चुका, दोष काढले होते. त्याची तारखेसह निरीक्षण टिप्पणीची छायाकिंत प्रत.

४. कार्यकारी अभियंता यांनी जे मंजूर बिले अदा केलीत त्या मंजूर बिलांची मोजमाप पुस्तकातील नोंद घेतल्याची व उप अभियंता यांनी टक्केवारी चेक केलेल्या पानांची छायाकिंत प्रत.

५. कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यांच्या कलम १९(१) नुसार प्राप्त झालेल्या अपीलांच्या छायाकिंत प्रती.

६. कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त अपीलांवर दिलेल्या निकालांची छायाकिंत प्रत प्रत्येकी एक.

७. कार्यकारी अभियंता यांनी अपीलकारांना ज्या तारखेस अपीलास बोलावले होते. त्याच दिवशी अपील सुनावणी करण्यात आली होती का? त्या संदर्भात उपलब्ध कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती , प्रत्येकी एक.

जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित वेळेत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकर्ता यांनी मुळ अर्जातील मागीतलेली माहिती ही विस्तृत स्वरूपाची आहे. म्हणून जन माहिती अधिका-यांने अपीलकारास कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत फाईल / कागदपत्राचे निरीक्षण करण्याबाबत दि.२१.०८.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता उपस्थित नव्हते. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून फाईलचे निरीक्षण करावे. आवश्यक माहितीची निवड करावी. जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसात निवडक कागदपत्राच्या प्रती अपीलकारास उपलब्ध करून द्याव्यात असे आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवा बाबी संबंधी अनुषंगीक एकूण ७ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची संदीग्ध असल्याने सर्व संबंधीत फाईल / कागदपत्राचे प्रथम कार्यालयात उपस्थित राहून निरीक्षण करण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी कळविले होते. तसेच त्यानंतर निवडक कागदपत्राच्या प्रती पुरविण्याची तयारी दर्शविली होती. परंतू अपीलकार कार्यालयात कागदपत्राच्या निरीक्षणाकरिता उपस्थित राहिले नाहीत. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीच्या छायाप्रती अपीलकारास हव्या आहेत. मागीतलेल्या माहितीचे स्वरुप मोठयाप्रमाणात व संदिग्ध असल्याने माहिती पुरविणे शक्य होत नाही असा उत्तरदवादीने सुनावणीचेवेळी आयोगासमोर युक्तीवाद केला. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २७.०१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८४/०२**

**श्री.हेमंत वसंत भावसार**
**५, प्रधान पार्क, म.गांधी रोड,**
**नाशिक ४२२ ००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**महावितरण, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या,**
**४ था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक**
**महावितरण, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या,**
**४ था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.हेमंत भावसार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०५.२००९ अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

जाहिरात क्र.म.रा.वि.कं.लि.६/२००८ १) कार्य अभियंता (वितरण) या पदाच्या परिक्षेत (लेखी व तोंडी) अपीलकारास (रोल नं.११०१०८०८८०) किती मार्क मिळाले. २) तसेच कार्य अभियंता (वितरण) या पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेत प्रत्येकी किती मार्क मिळाले.

जन माहिती अधिका-यांनी दि.२०.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास उक्त अधिनियमातील कलम ८ व ११ अनुसार माहिती नाकारली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२१.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

दि.१८.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०६.२००९ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील दि.१८.०८.२००९ रोजी निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कार्यकारी अभियंता परीक्षेत अपीलकारास किती मार्क मिळाले. कार्यकारी अभियंता परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेत प्रत्येकी किती मार्क मिळाले याबाबत माहिती मागीतली होती. त्रयस्था पक्षाची माहिती देणे शक्य नाही. संस्थेच्या दृष्टीने, मार्क प्रगट केल्यास त्रयस्था पक्षाच्या विश्वासाहर्ततेला हानी पोहोचेल अशी माहिती उक्त अधिनियमातील कलम ८(१) (ई) व (ग) प्रमाणे देता येणे शक्य नाही. असे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (ई) व (ग) चा अधार घेउन अपीलकारास माहिती नाकारता येत नाही. जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८३/०२**

**श्री. जहिरुद्यीन शेख**
**मिशन कंपाउड, राहुरी,**
**जि.अहमदनगर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जहिरुद्यीन शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०६.२००९ अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. महाराष्ट्र शासनाने सह.सेवा संस्थाबाबत प्रा.बैधनाथन समितीच्या स्विकृत केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने सदर शिफारशी अमंलबजावणीचा सविस्तर आदेशाची प्रत.
२. महा.सह संस्था अधिनियम, १९६० यामधील (जाने २००७ ते आजपावेतो) महा.अधिनियम क्रमांकामधील वेळोवेळी शासनाकडून झालेल्या सुधारणांच्या प्रती.
३. महा.सह.संस्था नियम १९६१ या नियमात राज्य शासनाकडून वेळोवेळी सुधारणा झालेल्या अधिसुचनांच्या प्रती (जाने २००७ ते आजपावेतो) वरील अ.क्र.१ ते ३ मुद्यांतील प्रती मिळाव्यात.

मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१०.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवा संस्थाबाबत प्रा.बैद्यनाथन समितीने शासनास सादर केलेल्या शिफारसीबाबत अनुषंगीक एकूण ३ मुद्यावर माहिती मागीतली होती. माहितीपोटी रु.३०/- अधिक पोस्टाचा खर्च असे एकूण रु.५२/- इतके शुल्क भरण्याबाबत अपीलकारास कळविले. त्यानुसार अपीलकाराने शुल्क भरल्यानंतर दि.०८.०९.२००९ रोजीच्या पत्रासोबत Speed Post ने अपीलकारास आवश्यक ती माहिती पाठविण्यात आली असे जन माहिती अधिका-यांनी लेखी खुलासा आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८२/०२**

**श्री. वसंत मनोरकर**
**गोमटेश इलेक्ट्रॉनिक्स, सराफ रोड,**
**खादी भांडार समोर, औरंगाबाद ४३१ ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.वसंत मनोरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.१०.२००८ अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

अ) महाराष्ट्र राज्यात पशु व पक्षि यांची बळी प्रथा थांबविणे बाबत श्री.दिगंबर जैन सेवा समिती, औरंगाबाद यांनी वेळोवेळी सादर केलेल्या निवेदनावर कक्ष अधिकारी, कृषी, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी मा.आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचेकडून प्राप्त अभिप्रायावर दि.१४.१२.२००७ रोजी कार्यालयीन टिप्पणी सादर केली होती. त्यावर सक्षम अधिकारी यांचे मान्यतेने व अभिप्रायानुसार धारिका पुढील कार्यवाहीसाठी सामाजिक न्यायविभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना सादर करण्यात आली होती. सदर विभागाने हस्तांतर अमान्य करुन मुळ धारिका कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना दि.०१.०२.२००८ रोजी परत केली. सोबत प्रत जोडली आहे. सदर धारिका परत आपले विभागास

प्राप्त झाल्यानंतर आपले कार्यालयाने केलेल्या पत्रव्यवहाराचे / कार्यालयीन टिप्पणीचे / कार्यवाहीचे पत्रांच्या प्रमाणित प्रती पाहिजे आहे.

ब) महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-३ दि.१२.०५.२००६ अ.क्र.१० (१) मधील परिच्छेद क्र.४ अनुसार प्रत्येक प्रकरण तीन महिण्याच्या आत निकाली काढावे असे शासनाचेच आदेश आहेत. सदर तरतूदीनुसार प्रस्तुत प्रकरण काढण्याचे दृष्टिने दि.०१.०२.२००८ पासून पुढे काय कार्यवाही केली त्याबाबतचे पत्रव्यवहाराचे प्रती. कार्यवाही केलेली नसल्यास ती का करण्यात आली नाही हे दर्शविणारे पत्रव्यवहाराचे / कायालयीन टिप्पणीचे प्रमाणित प्रत पाहिजे आहे.

अंधश्रध्दा निर्मुलनाचे विद्येयक अद्याप पर्यंत विधामंडळाने संम्मत केलेले नाही. संपूर्ण गोवंश हत्याबंदी केल्यास शेतक-याच्या आर्थिक परिस्थितीवर व अनुषंगीक अद्योगधंदयावर होणा-या परिणामाबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी समिती गठीत केली आहे. अहवाल अप्राप्त आहे. अंधश्रध्दा निर्मुलन कायदा विधान मंडळाने संमत केला किंवा गोवंश हत्याबंदी निमित्य स्थापित केलेल्या कमिटीने निर्णय दिला की, पुढील कारवाई शासन स्तरावरुन करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले. या प्रकरणी प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. जन माहिती अधिका-यांनीच चुकीची दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, राज्यातील पशुधनाची होणारी हानी थांबविण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती

अपीलकारास पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. विद्येयकात पशू व पक्षी बळी प्रथा थांबविणेबाबत कोणताही मुध्दा नाही. उत्तरवादीने चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केली आहे. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.०१.२०१०**

(रामानंद तिवारी)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/४९४/०२**

**श्री.राजेश सांडूजी हिवराळे**
**श्री.सोनावणे बी.व्ही. (वनपाल)**
**घर क्र.२६१ मिलींद नगर, उस्मानपूरा,**
**औरंगाबाद ४३१ ००५.** **.... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.राजेश हिवराळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून अपीलकाराच्या उत्तरपत्रिकाचे बरोबर मुल्यमापन केले नसल्याने पुन्हा मुल्यमापण करण्याची तक्रारदाराने मागणी केली होती. गैरतक्रारदाराने समाधानकारक माहिती पुरविली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००८/२३७५/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदाराच्या माहितीच्या अधिकारातील अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबत तक्रारदारास माहिती देणे आवश्यक आहे. म्हणून आयुक्त, आदिवासी विकास यांनी अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांना आदेश द्यावेत की तक्रारदाराच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती ३० दिवसाचे आत तक्रारदारास कळवावी असे आयोगाने दि.११.०५.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही

गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने क्र.४९४/०२ ही तक्रार आयोगाकडे दाखल केली.

माद्यमिक शिक्षक भरती परीक्षा सन २००६ प्रश्नपत्रिका व त्यांचे नमुना उत्तरपत्रिका तत्कालीन निवड समितीचे अध्यक्ष तथा अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक श्री.चंद्रकांत खाडे, भा.प्र.से. प्रादेशिक व्यवस्थापक, वन विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी तयार केली असल्यामुळे त्यांचे अभिप्राय मागविण्यात आले. श्री.खाडे यांनी दि.३०.०५.२००९ रोजी अभिप्राय कळविले. सदर अभिप्रायानुसार नमुना उत्तरपत्रिकेतील उत्तरे बरोबर असून तक्रारदार श्री.हिवराळे यांचे गुणामध्ये कोणताही फरक पडत नाही. त्यांना देण्यात आलेले गुण बरोबर आहेत. त्यानुसार तक्रारदारास गैरतक्रारदाराने दि.११.०६.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे गैरतक्रारदार अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २५.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५०१/०२**

**श्री.विश्वनाथ केशव विचारे**
**२०३-अ, वैशाली को.ऑ.हौ.सोसा.,**
**अलीयावर जंग मार्ग, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगर रचनाकार**
**मुद्रांक जिल्हाधिकारी (अमंल-२),**
**प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.विश्वनाथ विचारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेगाकडे दि.२०.०९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, वैशाली सहकारी गृहनिर्माण संस्था, मुंबई ५१ या संस्थेतील सदनिकाधारक श्रीमती.तसनीम आझमी यांनी चुकविलेल्या मुद्रांक शुल्काच्या अनुषंगाने माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने समाधानकारक माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने अपील क्र.२००९/३११५/०२ हे व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले होते. सदर प्रकरणाशी संबंधीत दस्ताची प्रमाणित प्रत प्राप्त करून तक्रारदारास पुरवावी असे दि.३१.०८.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतर गैरतक्रारदाराने दि.१५.०९.२००९ च्या पत्रान्वये तक्रारदारास माहिती पुरविली. सदर माहिती अपूर्ण

व चुकीची असल्याचे नमुद करुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार क्र.५०१/०२ ही तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार संबंधीत प्रकरणाची तपासणी मुद्रांक जिल्हाधिकारी अंधेरी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जाउन केली. तपासणीत श्रीमती. तसनिम आझमी यांनी त्यांचे दस्तावर मुद्रांक शुल्क रु.२७, ३८०/- व दंड रु.२५०/- चलनाव्दारे रिझर्व बँकेत जमा केल्याचे निदर्शनास आले. दस्त प्रमाणिकरणाची कार्यवाही मुदांक जिल्हाधिकारी अंधेरी यांचेकडून झालेली नव्हती. वस्तुस्थितीच्या छायाप्रती तक्रारदारास दि.१५.०९.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे असा लेखी अहवाल गैरतक्रारदाराने आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. तसेच सदर प्रकरणात श्रीमती.आझमी यांचा मुळ दस्त उपलब्ध असून अद्यापर्यंत मुद्रांक जिल्हाधिकारी अंधेरी यांचे कार्यालयाकडून प्रमाणित झालेला नसल्याने त्याची प्रत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असेही आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५१३/०२**

**श्रीमती.मीता नवाथे**
**७, गोंविद निवास, आनंद नगर,**
**जे.एम.रोड, भांडूप (प),**
**मुंबई ४०० ०७८.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य अधिकारी,**
**म्हाडा, मुंबई बोर्ड, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती.मीता नवाथे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, म्हाडाने, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती वर्गवारीच्या नागरीकाकरिता सदनिका आरक्षीत ठेवल्या होत्या. त्या यशस्वी अर्जदारास वाटप करण्यात आल्या. त्या पत्राच्या तारखा, संबंधीत अर्जदारांनी सादर केलेल्या जाती / जमातीच्या वैद्यता प्रमाणपत्राच्या वैद्यतेबाबत सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे अपील क्र.२००९/३३५६/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. अपीलकाराने मागणी केलेली माहिती १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी असे आयोगाने दि.२३.१०.२००९ रोजी आदेश

पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रार ५१३/०२ ही आयोगाकडे दाखल केली.

सन २००६ व २००८ मध्ये प्रसारित करण्यात आलेल्या जाहिरातीच्या माहिती पुस्तिकातील माहिती वरून ST.NT.DT. या आरक्षीत जाती / जमातीसाठी जात प्रमाणपत्र देणे आवश्यक असल्याचे नमुद केलेली असून या आरक्षणांतर्गत यशस्वी ठरलेल्या अर्जदारास जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असल्याचा उल्लेख दिसून येत नाही. अशी गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२०.१०.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे पत्राची प्रत आयोगास सादर करून प्रतिपादन केले. तक्रारदाराने विनिर्दीष्ट माहिती मागीतल्याचे दिसून येत नाही. गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५०५/०२**

**श्री.ॲड.सचिन गजानन आडकर**
**अे-२/३४, प्रतिक्षा नगर,**
**सायन, मुंबई ४०० ०३२. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.सचिन आडकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. गैतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, सेतु सुविधा केंद्रामार्फत जातीचे दाखले निर्गमित करण्यात येतात याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने अपीलकारास माहिती पुरविली होती. गैरतक्रारदारास संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करण्यास परवानगी द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी तक्रारदारास सूचना दिल्या होत्या. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/३११९/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास दिलेल्या विशेष मागास प्रवर्गाच्या जातीच्या प्रमाणपत्रात चुका असल्याचे (Spelling Mistskes) तसेच चुकीच्या शासन आदेशाचा उल्लेख केला असल्याचे तक्रारदाराने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले होते. अपीलकाराच्या जातीच्या प्रमाणपत्रातील चुकीची दुरुस्ती करून द्यावी असे आयोगाने दि.२१.०८.२००९ रोजी आदेश पारित

केले होते. त्यानंतरही अपीलकारास चुकीची दुरुस्ती करुन जातीचे प्रमाणपत्र दिले नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने क्र.५०५/०२ ही तक्रार राज्य माहिती आयोगाकडे दाखल केली.

राज्य माहिती आयोगाने तक्रार क्र.२००९/४८१/०२ मध्ये दि.१४.१२.२००९ रेजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन गैरतक्रारदाराने, तक्रारदार ॲड.आडकर यांचे जातीचे प्रमाणपत्र दुरुस्त केले. दुरुस्त केलेले जात प्रमाणपत्र तक्रारदाराच्या राहत्या पत्यावर Registred Post ने पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे क्र.५०५/०२ हया तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. गैरतक्रारदाराने आयोगास लेखी दिलेल्या आश्वासनानुसार तक्रारदाराचे जात प्रमाणपत्र तात्काळ पोच देय डाकेने तक्रारदारास पाठवावे. या प्रकरणी तक्रारदाराचे जात प्रमाणपत्र दुरुस्त करुन पाठविण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २७.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५०३/०२**

**श्री.अशोक महादेव बनसोडे**
**१०३, गोराई सम्राट, अशोक को.ऑ.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.१०२, गोराई २, बोरीवली (प),**
**मुंबई ४०० ०९२. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**संस्थेचे प्रशासक मंडळ,**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.अशोक बनसोडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, गोराई सम्राट अशोक सहाकारी गृहनिर्माण संस्था लि. गोराई, बोरीवली (प) मुंबई या संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने अपील क्र.२००९/३०८०/०२ हे व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले होते. संस्थेच्या कार्यालयात अपीलकाराने उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करावे. त्यानंतर आवश्यक कागदपत्राची मागणी करावी. गैरतक्रारदारांनी मागणीनुसार कागदपत्र उपलब्ध करून द्यावीत असे आयोगाने व्दितीय अपीलावर दि.१७.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही

गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील आहे. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास उपलब्ध करून द्यावी अशा प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी संस्थेला सूचना दिल्या असल्याचे गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. संस्थेने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत गैरतक्रारदाराने संस्थेला सूचना द्याव्यात.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/४९२/०२**

**श्री.संतोष गणेश आव्हाड**
**क.लिपीक, प्रति लेखापरिक्षक क्षे-२,**
**सहकारी संस्था संगमनेर,**
**ता.संगमनेर, जि.अहमदनगर. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, (पदुम)**
**सहकारी संस्था अहमदनगर,**
**जिल्हा सेवानियोजन कार्यालय,**
**हॉटेल प्रेमदानच्या मागे, सावेडी,**
**जि.अमदनगर. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.संतोष आव्हाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, अपंग कल्याणाशी निगडीत शासकीय / निमशासकीय संघटना, तसेच अपंगत्वाचा प्रकार, लिंग, जात इत्यादीबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने अपील क्र.२००९/२५१५/०२ हे व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले होते. तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२७.०५.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने तक्रार क्र.४९२/०२ ही तक्रार आयोगाकडे दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने माहिती पुरविलेली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती योग्य नाही. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**<br>
**दिनांक २७.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६३/०२**

**श्री. कैलास सत्रे**
**नाथ पेपर मिल्स स्टॉप,**
**रामेश्वर नगर, एम.आय.डी.सी पैठन,**
**ता.पैठन, जि.औरंगाबाद. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.कैलास सत्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०७.२००८ अर्ज करुन, श्री.प्र.का.पवार व श्री.ग.प्र.पवार यांचे दुसरे दुकानाचे प्राधिकारपत्र कायमचे रद्द करुन १९५५ कायद्यातील कलम ३ व ७ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत माहिती मागीतली होती. अपूर्ण व दिशाभूल करुन दस्तऐवज दिले नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.०८.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार

उपस्थित नव्हते.  सुनावणीचेवेळी उत्तरवादी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, श्री.प्र.का व श्री.गणेश पवार यांनी स्वस्त धान्य दुकान मु.पो.लाडसांगवी ता.जि.औरंगाबाद यांनी शास.माल ग्राहकांना जादयादराने विक्री, माल अफरातफर, नियमाचे उल्लंघन, गंभीर दोष म्हणून १००/- अनामत जप्त करुन २ रे दुकान कायम रद्द करुन फौजदारी गुन्हे दाखल करुन तसा अहवाल मिळण्याबाबत मागणी केली होती.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास संबंधीत शासन निर्णयाच्या प्रती विनाशुल्क अपीलकारास पाठवाव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६२/०२**

**श्री. माने ज्ञानोबा इश्वर**
**बामसेफ मराठवाडा विभाग,**
**६/२, ऑफिसर कॉलनी, नगर रोड,**
**बीड. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**३, महापालिका मार्ग,**
**पत्र पेटी क्र.१९३७, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**३, महापालिका मार्ग,**
**पत्र पेटी क्र.१९३७, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.ज्ञानोबा माने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.१०.२००८ अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

संचालक तंत्रशिक्षण यांच्या आस्थापनेवरील शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता ते विभाग प्रमुख या पदाच्या पदोन्नतीसाठी आपल्या कार्यालयात जतन करण्यात आलेल्या बिंदू नामावली रजिस्टरची सत्यप्रत.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जामध्ये कोणत्या संस्थेची माहिती अपीलकारास हवी आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे कोणती माहिती द्यावी याचा बोध होत नाही.

म्हणून उत्तर देण्यात आले नाही. दि.२४.०८.२००८ च्या पत्रान्वये विचारलेली माहिती कार्यालयास कळवावी. म्हणजे अपीलकारास उत्तर देणे शक्य होईल असे उत्तरवादीने अपीलकारास दि.०१.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता ते विभाग प्रमुख पदाच्या पदोन्नतीसाठीच्या बिंदू नामावलीबाबत माहिती, मागासवर्गीय कक्ष कमिटीची सत्य प्रत मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३१९५/०२**

**श्री. संदिप वसंत बने**
**ए/१, शिवदर्शन, क्रॉस सयानी रोड,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.संदीप बने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे सर्व शासकीय कर्मचा-यांनी स्वत:ची स्थावर व जंगम मालमत्ता दर वर्षी जाहीर करणे आवश्यक आहे किंवा नाही?

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र शासनाने जाहिर केल्याप्रमाणे सर्व शासकीय कर्मचा-यांनी स्वत:ची स्थावर व जंगम मालमत्ता दर वर्षी जाहिर करणे आवश्यक आहे किंवा नाही इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३१९७/०२**

**श्री. संदिप वसंत बने**
**ए/१, शिवदर्शन, क्रॉस सयानी रोड,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संदीप बने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, अभय योजनेअंतर्गत किती प्रकरणे दाखल झाली इत्यादी एकूण १० मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अभय योजनेबाबत एकूण ११ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २९.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३२९८/०२**

**श्री. संदिप वसंत बने**
**ए/१, शिवदर्शन, क्रॉस सयानी रोड,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.संदीप बने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत चाळीचा पर्नविकास होणा-या निवासी (Residence) व अनिवासी (Commercial) भाडेकरूस मुद्रांकशुल्क आकारणेच्या पध्दतीची तपशिलवार माहिती.

२. पुर्नरचित इमारतीमध्ये निवासी (Residence) भाडेकरुन अनिवासी गाळा व अनिवासी (Commercial) भाडेकरूस निवासी गाळा वितरील झाल्यास त्यांना मुद्राकशुल्क आकारणेच्या पध्दतीची तपशिलवार माहिती.

३. २२५ चौ. फुटापर्यंत क्षेत्र असणारे अनिवासी (Commercial) भाडेकरूस, २२५ चौ.फुट निवासी क्षेत्राचा गाळा वितरीत झाल्यास त्याला किती मुद्रांकशुल्क आकारणेत येईल.

४. निवासी गाळा वितरीत झाल्यास उपरोक्त कलम (२) मधील पध्दत आतापर्यंत सर्व प्रकरणामध्ये वापरण्यात आली आहे का?

मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत चाळीचा पुर्नविकास होणा-या निवासी व अनिवासी भाडेकरूस मुद्रांक शुल्क आकारण्याच्या पध्दतीची तपशिलवार माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३१९८/०२**

**श्री. संदिप वसंत बने**
**ए/१, शिवदर्शन, क्रॉस सयानी रोड,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संदीप बने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, सन २००० ते २००८ या कालावधीची खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. सदर कालावधीत प्रत्येक वर्षी एकुण किती प्रकरणे ॲडज्यडीकेशनकरीता दाखल झाली.

२. सदर कालावधीत प्रत्येक वर्षी किती प्रकरणे निकाली निघाली.

३. निकाली न निघालेली प्रकरणे कोणत्या कारणांसाठी निकाली निघाली नाही.

४. जी प्रकरणे निकाली निघाली नाहीत त्या पक्षकारांनां प्रकरण निकाली ज्या कारणासाठी निघाले नाही ती कारणे लेखी कळविली आहेत का? कळविले नसल्यास किती प्रकरणांच्या पक्षकारांस कळविले नाही याची तपशिलवार माहिती.

अपीलकाराने मागणी केलेली माहितीचे स्वरुप उक्त अधिनियमातील कलम २ येथील माहितीच्या व्याख्येप्रमाणे नाही. म्हणून उत्तरवादीने माहिती नाकारली. यामुळे अपीलकाराने प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रकरणाच्या निकालाबाबत, ॲडज्युडीकेशनकरिता दाखल झाल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती मागीतली आहे. याबाबत मी असे आदेश देतो की, कामाच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. तरी जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२९५/०२**

**श्री. राजाराम सर्जू विश्वकर्मा**
**प्लॉन नं.३, सेंट्रल बँक कॉलनी,**
**गट नं.१९०/४, पिंपोळा, जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी**
**नाशिक विभाग, नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
**जळगांव, जि.जळगांव. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.राजाराम विश्वकर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.११.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, हिंदू लोहार ही जात केंद्राच्या सूचित कोणत्या प्रवर्गात येते. याबाबत माहिती मागीतली होती. कार्यालयाचे एस.ओ.फाईल/स्थाई सचिकेत शोध घेतला असता शासन निर्णय आढळून आला नाही. शासनाशी संपर्क साधून, शासनाच्या संकेतस्थळावरुन शासन निर्णय प्राप्त करुन घ्यावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१७.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी प्रसिध्द केलेल्या राजपत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, हिंदू लोहार ही जात महाराष्ट्रात एन.टी.मध्ये येते. सदरची जात केंद्र सरकारच्या जातीच्या सूचित कोणत्या प्रवर्गात येते याबाबत माहिती मागीतली होती. केंद्र शासनाने सन २००९ मध्ये इतर मागासवर्गाची सूची प्रसिध्द केली त्यामध्ये लोहार ही जात का वगळण्यात आली याबाबत अपीलकारास माहिती जानून घ्यावयाची आहे. केंद्र शासनाने सन १९९३ मध्ये प्रसिध्द केलेल्या इतर मागास वर्गीयाच्या यादीत लोहार जातीचा समावेश होता असे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी अपीलकारास असा सल्ला देतो की, सदर प्रकरणी अपीलकाराने केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाच्या संपर्कात रहावे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २८.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२९६/०२**

**श्री. कांबळे अर्जून गणपत**
**वास्त्यल्य निवास,**
**विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ,**
**शाहू नगर, केडगांव, अहमदनगर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**प्राथमिक, प्राशि-३,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**प्राथमिक, प्राशि-३,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.कांबळे अर्जून यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.११.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकडील पत्र क्र.खाप्राश/७०८/५११-ड/६०२८ दि.०७.१०.२००८ अन्वये पुणे विभागातील आपणास प्राप्त झालेल्या शाळा वा तुकडया अनुदानावर आणण्यासाठी शिफारस केलेल्या यादीची झेरॉक्स.

शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकडील पत्र क्र.खाप्राशा/वर्ग.तु/अनु/२००८-२००९/ड-५१२ दि.२१.१०.२००८ अन्वये पुणे विभागातील आपणास प्राप्त झालेल्या शाळा वा तुकडया अनुदानावर आणण्यासाठी शिफारस केलेल्या यादीची झेरॉक्स.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०४.०४.२००९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

प्राथमिक शाळांचे वर्ग/तुकडयांना अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावावरील कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. सद्यस्थितीत लोकसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने, सदर प्रकरणी निर्णय होणेसाठी काही अवधी लागणार आहे. त्यामुळे आपणांस आवश्यक असलेली माहिती आपणांस सुध्दा उपलब्ध करुन देता येणार नाही. त्याबाबत शासन दिलगीर आहे.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शाळा वा तुकडया अनुदानावर आणण्यासाठी शिफारस केलेल्या यादीची प्रत मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती का? पुरविलेली नाही. याबाबत जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२९३/०२**

**श्री. चंद्रकांत बाबूराव अडसूळे**
**शाहू चौक, लातूर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शायकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०३०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शायकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०३०.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.चंद्रकांत अडसुळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

'अ' वर्ग नगर परिषदेतील सार्वजनिक बांधकाम विभागातील खालील नगर परिषद अभियंता याचे पद निहाय १) प्रशासकीय मान्यता २) आर्थिक मान्यता ३) तांत्रिक मान्यता, प्रदान करण्याचे अधिकार मर्यादा तपशिल (स्थापत्य अभियंताचे) अधिकार मंजूरी दिनांकासह.

अ) नगरपरिषद अभियंता निवडश्रेणी : ८०००-१३५०० वेतन श्रेणी

ब) नगरपरिषद अभियंता श्रेणी 'अ' : ६५००-१०५०० वेतन श्रेणी

क) नगरपरिषद अभियंता श्रेणी 'ब' : ५५००-९५०० वेतन श्रेणी

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही.  यामुळे अपीलकाराने दि.११.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.  सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली.  अपीलकारास विहित मुदतीनंतर माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.१६.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले.  नियमानुसार ३० दिवस उलटून गेल्यानंतर अपीलकारास मोफत माहिती पुरवावयाची आहे.  तरी अपीलकारास १५ दिवसाचे आत निशुल्क माहिती पुरवावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.०९.२००९ रोजी आदेश पारित केले.  त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, नगरपरिषद अभियंत्याच्या पदाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकारास निशुल्क माहिती पुरवावी असे दि.११.०९.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले होते.  त्यानुसार उत्तरवादीने दि.०७.१०.२००९ च्या पत्रानुसार अपीलकारास मोफत माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.  तसेच यासंदर्भातील नगर विकास विभागाशी संबंधीत सूचनाही अपीलकारास पुरविण्यात आल्याचे उत्तरवादीने प्रतिपादन केले.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२८९/०२**

**श्री. चिक्से चंपालाल धोंडीराम**
**नविन नारळा, गोरोबा मंदिराजवळ,**
**वॉर्ड नं.३, घन नं.प्लॉट ७५, पैठण,**
**ता.पैठण, जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधनालय,**
**(आस्थापना विभाग-फ), मुंबई**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल आवार,**
**सी.एस.टी.जवळ, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधनालय,**
**(आस्थापना विभाग-फ), मुंबई**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल आवार,**
**सी.एस.टी.जवळ, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.चिक्से चंपालाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. शासन निर्णय क्र.ई.एस.पी १०८३/(४८०)/आ-तांब्रीक, मंत्रालय, मुंबई दि.३१.०१.१९८९ तांत्रिक वेतनश्रेणी पद फिटर / मिस्त्री असुधारित वेतनश्रेणी ९५०-१४०० ऐवजी सुधारीत तांत्रीक वेतनश्रेणी १२००-१८०० दि.०१.०१.१९८९ पासुन मिळणेबाबत.

२. पाचव्या वेतन आयेगाची विद्यमान वेनतश्रेणी ४५००-१२५-७००० ऐवजी सुधारीत वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० दि.०१.०१.१९९६ पासुन मिळणे शासन निर्णय क्र.वेतन २०००/-प्र.क्र.१०/सेवा-३/मंत्रालय, मुंबई ३२ दि.०३.०८.२००१ नुसार.

३. प्रतिनियुक्ती वेतन व भत्ते महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र.प्रवास १००५/प्र.क्र.१७/सेवा-५, मंत्रालय, मुंबई ३२ दि.१९.०६.२००६ नुसार.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२४.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराचे, चौथा व पाचव्या वेतन आयेगानुसार वेतन निश्चित करण्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उत्तरवादीने प्रलंबित असलेले प्रकरण हे आदेश मिळाल्यापासून दोन महिन्याचे आत निकाली काढावे. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास कळवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०१.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२९७/०२**

**श्री. बाळासाहेब नागोराव राउत**
**मु.पो.वडगांव, ता.सोनपेठ, जि.परभणी. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (प्रशासन)**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, प्रशा-५,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, प्रशा-५,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.बाळासाहेब राउत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

आपल्या विभागात वेतन निश्चितीचे बूकलेट पृ.क्र.३७१ वर "यांत्रिकी मेकॅनीक" पदाला वेतन बँड ५२००-२०२०० ग्रेड पे.२४०० सहाव्या आयोगात दर्शविला. तेव्हा सदर संवर्ग पदाचे सेवाप्रवेश कर्तव्य जवाबदा-या कोणत्या इ. माहिती उपलब्ध करुन द्यावी. केंद्राप्रमाणे राज्याला वेतन आयोग लागू असल्याचे मानले जाते. तेव्हा सदर संवर्ग पदाशी समतुल्य केंद्रशासनाकडील संवर्ग पद कोणते तेही स्पष्ट करुन त्याचेही सेवाप्रवेश कर्तव्य जवाबदा-या स्पष्ट करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी. आणि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ केंद्रशासनाने पारीत केलेले राजपत्र / GR / ज्यात कलमांचा समावेश आहे त्याबाबतचे बूकलेट / प्रत हे देखील उपलब्ध करुन द्यावे ही विनंती. जर वरील पैकी काही माहिती आपली नसेल तर ती कलम ८(क) नुसार ज्यांची आहे त्यांना माहिती

देण्याबाबत सुचीत करुन तसे अर्जदारास कळवण्यात यावे.  एकंदरीत समाधानकारक / परिपूर्ण / अर्थपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०९.१०.२००९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९९८ च्या पुस्तीकेतील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अधिपत्याखालील शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त पदांच्या अनुसुचित अ.क्र.१८३ वर व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ च्या पुस्तीकेतील पृष्ठ क्र.३७१ वरील अ.क्र.२०१ येथे दर्शविलेले यांत्रिक (मेकॅनिक) हे पद या विभागाच्या आकृतीबंधात आढळून आलेले नाही.  सदर पदाबाबब वित्त विभागाकडून तपासणी होणे आवश्यक आहे.  असे या विभागाच्या क्र.शिसंमा-११०८/(३१२/०८)/ प्रशा-५, दि.२७.०१.२००९ च्या पत्रान्वये वित्त विभागास कळविण्यात आले आहे.

यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, अपीलकार अनुपस्थित असल्याच्या कारणावरुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी श्री.प्र.द.सोनवणे तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.सु.स.सनगर उपस्थित होते.  अपीलकार उपस्थित नव्हते.  सुनावणीचेवेळी उत्तरवादी याचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, यांत्रिकी (मेकॉनिक) या पदाचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदा-या इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास उत्तरवादीने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२९०/०२**

**श्री. चिक्से चंपालाल धोंडीराम**
**नविन नारळा, गोरोबा मंदिराजवळ,**
**वॉर्ड नं.३, घन नं.प्लॉट ७५, पैठण,**
**ता.पैठण, जि.अहमदनगर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**(वै.सेवा-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**(वै.सेवा-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.चिक्से चंपालाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

प्रपाठक आरोग्य प्रशिक्षण पथक केंद्र पैठण कार्यालय प्रमुख डॉ.अ.पु.कुलकर्णी यांनी अधिकाराचा गैरवापर करुन हेतु पुरस्कृत सुढ बुध्दीने, जातीय नुसार वर्ण व्देशापोटी पुढील अनुसूचित मागासवर्गीय कर्मचा-यार निराधार आरोप ठेवून माणहानी व अत्महत्येस प्रवृत्त करुन मृत देहाची अवहेलना करुन गंभीर स्वरुपाचे गैर कृत्य केलेले आहे ते पुढील कर्मचारी वर्गावर झालेले

आहे. दि.२६.०२.२००८ रोजी लेखी स्वरुपाची तक्रार सादर केलेली आहे. पोलीस स्टेशन पैठण अंतर्गत गृहमंत्री महाराष्ट्र मुंबई यांच्याकडून सुध्दा तक्रार आलेली आहे.

१. श्रीमती झेड.सी.चव्हाण (अधिपरिचारीका) यांचा मृत देहाची अवहेलना व मृत्युस कारणीभूत कार्यालय प्रमुख डॉ.अ.पु.कुलकर्णी प्रपाठक सर्वस्वी जबाबदार.
२. श्री.जनार्धन शहाणे यांच्यावर निराधार आरोप ठेवुन संबंधीत अपमानीत होउन अत्महत्या करून घेतली या बाबतीत मुख्य डॉ.अ.पु.कुलकर्णी प्रपाठक सर्वस्वी जबाबदार.
३. श्री.भाउराव नाडे यांच्यावर रजेच्या कालावधीत निराधार पोलीस तक्रार नोंदवुन सेवेतुन निलंबीत करून कुंटूंबाची उपासमार याबाबतीत मुख्य डॉ.अ.पु.कुलकर्णी प्रपाठक सर्वस्वी जबाबदार.
४. श्री.एकनाथ मंत्री यांच्यावर सुध्दा निराधार आरोप ठेवुन सेवेतून निलंबीत करून कुंटूंबाची उपासमार या बाबतीत मुख्य डॉ.अ.पु.कुलकर्णी प्रपाठक सर्वस्वी जबाबदार.
५. अर्जदार स्वत: सि.डी.चिक्से यांच्यावर सुध्दा निराधार आरोप ठेवुन शासनास चुकीचा अहवाल सादर करून जातीय नुसार, वर्णव्देशापोटी आरोप ठेवुन मानहानी केलेली आहे.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२७.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२४.०९.२००९ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, प्रपाठक आरोग्य प्रशिक्षण पथक केंद्र पैठण कार्यालय प्रमुख डॉ.अ.पु.कुलकर्णी यांनी अधिकाराचा गैरवापक केल्याबाबत एकूण ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी

संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी अपीलकारास माहिती पाठविली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.के.अल्हाट तसेच जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.नि.भा.खेडकर यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपीलकारांनी आयोगासमोर सांगीतले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलकारास पुन्हा माहितीची एक प्रत पाठवावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६६/०२**

**श्री. सुरेश दगडू बडगुजर**
**३६, अभियंता नगर,**
**देवपूर, धुळे ४२४ ००२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**कृषि व पदुम विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कृषि व पदुम विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुरेश बडगुजर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०८.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

आपल्या मंत्रालयीन विभागाने, राजपत्रित वर्ग २ मधून, राजपत्रित वर्ग १ मध्ये पदोन्नती देण्याविषयी विभागीय पदोन्नती समितीच्या सभेच्या १९९८ ते २००९ या कालावधीतील झालेल्या सभेच्या इतिवृत्तांच्या साक्षांकन केलेल्या छायांकित प्रती पुरवाव्यात ही विनंती. तसेच सन १९९८ पासून पदोन्नती देण्यात आलेल्या अधिका-यांची आजपर्यंतची यादी सुध्दा द्यावी.

मी आपल्या मंत्रालयीन विभागाकडे माझ्यावर पदोन्नती संदर्भात झालेल्या अन्यायाविरुध्द अनेकवेळा निवेदने सादर केलेली आहेत. त्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकन केलेल्या छायांकित प्रती पुरवाव्यात ही विनंती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराकडून रु.२००/- इतके शुल्क आकारुन अपीलकारास दि.०८.१०.२००९ च्या पत्रानुसार माहिती पुरविली. उत्तरवादीने अपीलकारास फक्त १ मुद्याबाबत माहिती पुरविली. तीही साक्षांकित करुन दिली नाही. उर्वरित २ मुद्यावरील माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.१६.११.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वर्ग-२ मधून, राजपत्रित वर्ग-१ मध्ये पदोन्नती देण्याविषयी पदोन्नती समितीच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त, पदोन्नत अधिका-याची यादी मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनाणीचेवेळी प्रतिपादन केले. आता सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६५/०२**

**डॉ.रामप्रसाद माधवराव पोरवाल**
**बालाजी मंदीर रोड, मोंढा-परतूर. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी**
**नगर पारिषद, परतूर,**
**ता.परतूर, जि.जालना.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर पारिषद, परतूर,**
**ता.परतूर, जि.जालना. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ.रामप्रसाद पोरवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. न.प.चे पत्रक नूसार ८९५/२००८ १७/११/०८ नुसार प्लॉट वर बांधकाम परवानगी दिलेली नाही तरी जेव्हा बांधकाम परवानगी दिली नाही तर न.प.प्रशासनाने सदरील प्लॉट वर अनधिकृत बांधकाम रोकणे विषयी केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. स्वच्छता निरीक्षकाच्या अहवालाची सत्यप्रत.

२. अनधिकृत बांधकाम शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून करणारे याना सदरील प्लॉट न.प. अंतर्गत येत असल्यामुळे न.प.चे मुख्य अधिकारी यांनी नोटीस दिली काय? नोटीसची सत्यप्रत.

३. स.न.३०७ मधील सर्व बांधकामाची (किती प्लॉटवर बांधकाम) माहिती व कोण बांधकाम करित आहे. व त्यांची नावे व बांधकाम परवानगी ची नक्कल सत्यप्रत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.१२.२००८ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले.

१. मुद्‌दा क्र.१ च्या अनुषंगाने नगर परिषद परतूर ने अनाधिकृत बांधकाम रोकणे विषयी काय कार्यवाही केली ही माहिती देणे माहिती अधिकार कक्षात बसत नाही. तसेच स्वच्छता निरिक्षक यांचा अहवाल या कार्यालयात प्राप्त नसल्याने सदर अहवालाची सत्यप्रत देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

२. मुद्‌दा क्र.२ च्या अनुषंगाने संबंधीतास नोटीस या कार्यालयामार्फत देण्यात आलेली नाही.

३. मुद्‌दा क्र.३ च्या अनुषंगाने सर्वे नं. ३०७ मधील बांधकाम विषयी सर्वे करुन सदर माहिती आपणास देण्यात येईल.

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१५.०१.२००९ प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शासनाच्या सर्व्हे क्र.३०७ मधील मनोहर उके किंवा अनंत बागल यांच्या प्लॉटवर अनधिकृतरित्या बांधकाम चालू आहे याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.

सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास

माहिती पुरवावी.  अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

<u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६४/०२**

**डॉ.रामप्रसाद माधवराव पोरवाल**
**बालाजी मंदीर रोड, मोंढा-परतूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, परतूर,**
**ता.परतूर, जि.जालना.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, परतूर,**
**ता.परतूर, जि.जालना. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ.रामप्रसाद पोरवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. परतूर सज्जा नगर परिषद अंतर्गत असलेल्या शासकीय स.न.३०७ (पोलीस चौकी मेन रोड ते रेल्वे चौकी पर्यंत) मधील प्लॉट अधिकृत रित्या किती जणाना दिलेले आहेत? प्लॉट नंबर सह ज्याना प्लॉट दिले त्यांच्या नावाची माहिती संपूर्ण प्लॉट किती आहेत. (संख्या)
२. शासनाने स.न.३०७४ मधील कबाळा दिलेल्या जागेवर सध्या त्याच व्यक्तिचा ताबा आहे किंवा त्यांनी कोण दुस-या व्यक्तिला ताबा देवुन जागेची विक्री केली काय? याची माहिती.
३. स.न.३०७ मधील प्लॉट धारकाना न.प.परतूर ने शासनाची पूर्व परवानगी घेवून बांधकाम परवानगी दिली आहे काय?
४. स.न.३०७ मध्ये ज्यांनी अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम केले त्यांचे विरुध्द तससिल ने केलेल्या कायदेशिर कार्यवाहीची माहिती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अर्जातील मुध्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध आहे. संचिकेचे अवलोकन करुन माहिती घेउन जावे. मुध्दा क्र.४ स.क्र.३०७ मध्ये अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम केले. त्यांच्या विरुध्द तहसिल कार्यालयाने कायदेशिर कार्यवाहीबाबतची संचिका उपलब्ध नाही. तरी मुध्दा क्र.४ बाबतची सद्या माहिती निरंक समजावी. मुध्दा क्र.३ सदरील माहिती कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे न.प.परतूर कडून उपलब्ध करुन द्यावी. मुध्दा क्र.२ अशा प्रकारचा सर्व्हे कार्यालयामार्फत केला नसल्यामुळे सदरील माहिती निरंक समजावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले.

चुक व अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०६.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, परतूर सज्जा नगरपरिषद अंतर्गत असलेल्या शासकीय सर्व्हे क्र.३०७ मधील प्लॉट बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीकडून माहिती प्राप्त झाली असल्याचे अपीलकाराने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सांगीतले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६७/०२**

**श्री. सुरेश दगडू बडगुजर**
**३६, अभियंता नगर,**
**देवपूर, धुळे ४२४ ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**कृषि व पदुम विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कृषि व पदुम विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुरेश बडगुजर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०९.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकाराच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या अनुषंगाने आयुक्त, (कृषी) कृषी आयुक्तालय, पुणे-१ यांनी पाठविलेल्या प्रस्तावाची साक्षांकित प्रत, दि.०१.०७.२००९ पासून शासन सेवेतून स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्यास, मंजूरी १ महिना १३ दिवस उशिराने देण्याचे प्रयोजन काय? तसेच सदर मंजूरीचे आदेश कोणत्या दिवशी पोस्टात टाकले याबाबत माहिती मागीतली होती.

उक्त अधिनियमातील कमल २(च) (झ) नुसार अपीलकारास आवश्यक असलेली तथापि शासन स्तरावर उपलब्ध असलेल्या कागदपत्राची मागणी केलेली नाही. प्रश्नार्थक माहितीची मागणी केलेली आहे. अशा प्रकारची माहिती देणे, माहितीचा अधिकार अधिनियम अभिप्रेत नाही. निश्चित स्वरुपाच्या माहितीच्या कागदपत्राची मागणी केल्यास ती अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात येईल असे उत्तरवादीने दि.१६.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले

नसल्याने अपीलकाराने दि.१६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी उत्तराचे समर्थन करुन दि.१९.११.२००९ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, स्वेच्छा सेवानिवृती एक महिना १३ दिवस उशिराने दिल्याबाबत माहिती मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली.  अपीलकारास स्वेच्छासेवानिवृत्तीचे आदेश उशिराने दिले.  सदर आदेश उशिराने का? दिले याबाबत माहिती पुरविण्याचीबाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मोडत नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२६१/०२**

**श्री. शिवकुमार रामदेव जोशी**
**गली नं.४, घर नं.२८९०, धुळे. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शिवकुमार जोशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०८.२००९ रोजी अर्ज करुन, जिल्हापरिषद धुळे, भास्कर वाघ अपहारप्रकरणाबाबत तात्कालीन जिल्हाधिकारी श्री.शिवाजीराव पाटील यांचेवर फौजदारी खटला न भरण्याची कारणे याबाबत माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली.

श्री.शिवाजीराव एलजी पाटील, तात्कालीन जिल्हाधिकारी, धुळे हे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिका-यांच्या संदर्भातील सर्व सेवाविषयक बाबींची प्रकरणे सामान्य प्रशासन विभागाकडून हाताळली जातात. त्यामुळे त्यासंदर्भातील निर्णय हा सामान्य प्रशासन विभागाकडून होणे अपेक्षित आहे. म्हणून यासंदर्भातील माहिती, माहिती अधिकारी तथा अवर सचिव, आस्था-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. म्हणून याबाबत अपीलकार श्री.जोशी यांनी सामान्य

प्रशासन विभागाकडून विहित मार्गाने संपर्क साधून आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन असे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१६.११.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जिल्हाधिकारी श्री.शिवाजीराव पाटील यांचेवर फौजदारी खटला न भरण्याच्या कारणाबाबत माहिती मागीतली होती. श्री.पाटील हे भा.प्र.से.मधील अधिकारी आहेत. भा.प्र.से. मधील अधिकारी आहेत. भा.प्र.से. मधील अधिका-याची सेवा विषयक प्रकरणे सा.प्र.वि कडून हाताळणी जातात. म्हणून सदर प्रकरणी माहिती प्राप्त करण्याकरिता सा.प्र.वि.कडे संपर्क साधण्याबाबत अपीलकारास उत्तरवादीने कळविले होते. अपीलकारास सदर उत्तर मान्य नाही असा त्यांनी व्दितीय अपीलात नमुद केले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सा.प्र.वि.च्या दि.०६.०१.१९९८ च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर प्रकरणी योग्यरित्या तसे अपीलकारास लेखी कळविण्यात यावे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३३७२/०२**

**श्री. मोहम्मद शरीफ अब्दुल हमीद बागबन**
**शाबनूर इंटप्रांयसेस, रूम नं.३९,**
**पहिला मजला, २९६, नागदेवी स्ट्रीट,**
**मुंबई ४०० ००३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप पोलीस आयुक्त,**
**परिमंडळ २, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**दक्षिण विभाग, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मो.शरिफ अब्दूल हमीद बागबन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०५.२००९ रोजी अर्ज करुन, पायधुनी पोलीस स्टेशन येथे अपीलकाराच्या फिर्यादिनुसार गु.नो.क्र.७५/०८ U/s १४७, १४९, ५०४, ५०६ (ii), ३४ IPC नोंदविण्यात आला. याबाबत अे. ते एन. अशा एकूण १४ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०९.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१५.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.०२.०७.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही गुन्हयाची कागदपत्रासंदर्भात आहे. सदर गुन्हयाची कागदपत्रे अदखलपात्र समरीसाठी न्यायालयात सादर होणार आहेत. अशाच प्रकरणात मा.न्यायालयाने अपीलकाराचा अर्ज फेटाळलेला आहे. असे अपीलातील कागदपत्राची तपासणी केली असता दिसून येते. तसेच कार्यालयातील उपलब्ध माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयेगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२७०/०२**

**श्रीमती. इशा डी.देशमुख**
**सौ.लिना रामदास ढोणे,**
**लोणी खुर्द, ता.राहता,**
**जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती. इशा डी.देशमुख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०३.२००९ रोजी अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम मंडळ, २५, मर्झबान रोड फोर्ट, मुंबई यांना दि.०१.०४.२००८ ते दि.१५.०३.२००९ या कालावधीत मिळालेल्या निधीबाबत एकूण २२ मुद्यावर माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२७.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०९.२००९, २१.१०.२००९, १२.११.२००९, २५.११.२००९, १७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार एकाही सुनावणीकरिता हजर राहिल्या नाहीत. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकारांनी व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम मंडळास मिळालेल्या निधीबाबत माहिती मागीतली होती. अर्जातील मुध्दा क्र.१ ते ३ बाबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती मंडळ कार्यालयातील उत्तरवादीने अपीलकारास पुरविली. अर्जातील उर्वरित मुद्याबाबतची माहिती क्षेत्रिय स्तरावरची आहे. म्हणून अपीलकाराच्या अर्जाच्या प्रती क्षेत्रिय कार्यालयाकडे पाठविण्यात आल्या आहेत. याबाबत काही क्षेत्रिय कार्यालयाकडून अपीलकारास माहिती पुरविण्यात आली. काही विभागांनी माहितीपोटी शुल्क भरण्याबाबत अपीलकारास कळविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता एकदाही हजर राहिल्या नाहीत. अपीलकाराने शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी संबंधीत विभागांना सूचना दिल्या असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास लेख्र अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात येत असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३५८५/०२**

**श्री.राम विठ्ठल धुरी**
**७७/१, तय्यबजी टेरेस,**
**रंजना देशमुख मार्ग, परेल,**
**मुंबई ४०० ०१२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ (दक्षिण विभाग) कार्यालय,**
**रुम नं.३२, २ रा मजला, डॉ.बी.ए.रोड, परेल,**
**मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (प व दु) २**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ (दक्षिण विभाग) कार्यालय,**
**रुम नं.३२, २ रा मजला, डॉ.बी.ए.रोड, परेल,**
**मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.राम धुरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०४.२००९ रोजी अर्ज करुन, भिवाजीराव नरे उद्यानाबाबत एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. प्रश्नार्थक स्वरूपाची माहिती पुरविणे बंधनकारक नाही. अपीलकाराने प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागीतली आहे. अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे उत्तरवादीने अपीलकारास दि.०१.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१८.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. उत्तरवादीने अपीलकारास ७ दिवसात माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.०७.२००९ रोजी आदेश पारित केले. अपिलीय प्राधिका-याच्या

आदेशानंतर चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, भिवाजीराव नरे उद्यानाबाबत एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०३.०७.२००९ च्या पत्रानुसार माहिती पुरविली असल्याचे दिसते. सदर पत्राची प्रत उत्तरवादीने आयोगास सादर करुन प्रतिपादन केले की, सदर प्रकरणी उत्तरवादीस माहिती पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२७१/०२**

**श्री. भास्कर जाधवर**
**बी.ॲन्ड सी.क्वॉटरजवळ,**
**पार्डी रोड, मु.पो.ता.भूम,**
**जि.उस्मानाबाद.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.भास्कर जाधवर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०९.२००८ रोजी अर्ज करुन, दि.०१.०८.१९८४ ते ३०.०६.२००३ पर्यंतच्या बेकादेशिरपणे थकवलेला पगार मिळणेबाबत व पेन्शन मिळणेबाबत. कोणत्या कायदेशिर तरतुदीनुसार पगार व पेन्शन बंद केली आहे याची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.३०.०८.२००८ च्या पत्रान्वये दि.१३.११.२००७ च्या पत्राची झेरॉक्स प्रत तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम २३ व नियम ६२ (४) ची छायाप्रत अपीलकारास पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२२.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव श्री.अरविंद चौधरी यांनी दि.०१.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती

पुरेशी असल्याचे नमुद करुन तसे अपीलकारास दि.०६.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. त्यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पगार व पेन्शनबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.३०.०८.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविलेली आहे. अपीलकार श्री.जाधवर हे ज्ञान प्रसारक महाविद्यालय, कळंब येथे अधिव्याख्याता पदावर कार्यरत होते. त्यांना दि.०१.०८.१९८४ रोजी महाविद्यालयातून कार्यमुक्त केले. त्यानंतर ते कोणत्याही नियुक्तीशिवाय नियतवयोमान होईपर्यंत म्हणजे दि.३०.०६.२००३ पर्यत कामाविना राहिले. अपीलकार दि.०१.०८.१९९४ ते ३०.०६.२००३ या कार्यकाळात कार्यरत नव्हते. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२ मधील नियम ११० (२) (ब) चा फायदा मिळू शकत नाही असे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.पु.हि.वागदे यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास सेवानिवृत्तीवेतन अनुज्ञेय होत नाही. सेवानिवृतीवेतन मंजूर करण्याची बाब राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. याकरिता अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी असे वाटते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३२०२/०२**

**श्री. अर्जुनलाल छाब्रीया**
**बेला विस्टा, प्लॅट नं.१५,**
**३ रा मजला,**
**लेक आणि एल आय सी कार्यालयाच्या विरुध्द,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त / कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिक,**
**जी/नॉर्थ वॉर्ड ऑफिस, दादर,**
**मुंबई ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिक,**
**जी/नॉर्थ वॉर्ड ऑफिस, दादर,**
**मुंबई ४०० ०२८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अर्जुनलाल छाब्रीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०४.२००९ रोजी अर्ज करुन, श्रीमती. शमीम बानो यांचे पतीचे निधन झाल्याने पण्याचे बील पतीच्या नावावरुन श्रीमती.बानो यांचे नाव बदलून देणेबाबत सादर अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती व अनुषंगीक एकूण ९ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.०४.२००९ च्या पत्रान्वये माहिती कळविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०४.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२०.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली.

कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरवावी. माहितीचे स्वरुप मोठे असल्याने अपीलकारास विशिष्ट कालावधीत माहिती पुरवावी असे दि.२६.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, पाण्याचे बील मयत पतीच्या नावावरुन श्रीमती.बानो यांचे नावाने बदलून मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८२/०२**

**श्री. प्रफुलचंद्र मधुकर शेळके**
**मधूर सोसा, चिंचोळी बंदर रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस निरीक्षक**
**टिळक रोड, विश्रामबाग पोलीस ठाणे,**
**बाजीराव रोड, सदाशिव पेठ, पुणे.**

**जन माहिती अधिकारी,**
**टिळक रोड, विश्रामबाग पोलीस ठाणे,**
**बाजीराव रोड, सदाशिव पेठ, पुणे. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रफुलचंद्र शेळके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०७.२००७ रोजी अर्ज करुन, बी-७ इंद्रसरी सोसायटी, महर्षीनगर पोलीस स्टेशन समोर, पुणे-३७ येथील श्री.योगेश दिगंबर वणवे यांचा पोलीस रेकॉर्ड, FIR, Chargesheet इत्यादी माहिती ४८ तासाचे आत मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०७.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.योगेश दिगंबर वणवे यांच्या पोलीस रेकॉर्ड मागीतला होता. अपीलकाराच्या मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२४०/०२**

**श्री.दे.म.अकोलकर**
**३३ (अ), रेणुका छत्रपतीनगर,**
**गारखेडा परिसर, औरंगाबाद ४३१ ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,**
**९, हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी.स्टेशनसमोर,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,**
**९, हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी.स्टेशनसमोर,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दे.म.अकोलकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, अपीलकाराचा दि.१४.०८.२००८ चा अर्ज आयोगात प्राप्त झाल्यापासून तो निकाली काढेपर्यंतची टिका टिप्पणी. प्रधान सचिव, रोजगार व स्वंयरोजगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्य मानवी हक्क आयोगाचे पत्र दि.०४.१०.२००८ च्या संदर्भात आयोगास सादर केलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.२७.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रधान सचिव, रोजगार व स्वंयरोजगार विभाग यांना राज्य मानवी हक्क आयोगाने दि.०४.१०.२००८ रोजी पत्र पाठविले होते. त्या अनुषंगाने प्रधान सचिवांनी राज्य मानवी हक्क आयोगास अहवाल सादर केला. सदर अहवालाची प्रत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३२१३/०२**

**श्रीमती. अर्चना राय**
**७२/२, बी.एम.सी. टेन्नंसी,**
**शेवरीं कालीवाडा,**
**मुंबई ४०० ०१५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/दक्षिण विभाग,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/दक्षिण विभाग,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती. अर्चना राय यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, अनामत रक्कम परत मिळण्याबाबत दि.०२.०६.२००८ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकाराचा अर्ज विहित नमुन्यात नाही. विनिर्दीष्ट स्वरुपाची माहिती मागीतल्यास माहिती देण्यास येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.०६.०२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२५.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०२.०४.२००९ रोजी सुनावणी घेउन आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अनामत रक्कम परत मिळण्याबाबत केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकाराची अनामत रक्कम परत करण्यात आली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३२३०/०२**

**श्री. जगदिश देवराम टोरपे**
**२५-ए, टोरपे हाउस,**
**पहिला मजला, तेजपाल क्सीम,**
**५ वा रोड, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जगदिश टोरपे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०४.२००९ रोजी अर्ज करून, नागरी संहिता कोड (Civil procedure Code) मधील कलम ८० अनुसार मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना दि.२२.०९.२००८ रोजी नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीनुसार करण्यात आलेल्या वैद्यनिक कारवाईबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना सी.पी.सी.कलम ८० अनुसार दिलेल्या नोटीसीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२३९/०२**

**श्री.दे.म.अकोलकर**
**३३ (अ), रेणुका छत्रपतीनगर,**
**गारखेडा परिसर, औरंगाबाद ४३१ ००५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय,**
**३ रा मजला (विस्तार), कोकण भवन,**
**सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**जन माहिती अधिकारी,**
**रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय,**
**३ रा मजला (विस्तार), कोकण भवन,**
**सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दे.म.अकोलकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००८ रोजी अर्ज करुन, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालयाने पत्र क्र.रोस्वंसं ६/लेखा विकस/अकोलकर/९७१-७२, दि.१५.१०.१९८५ वरुन अभिप्राय कळविले त्या उपप्रादेशिक सेवायोजन कार्यालय, औरंगाबाद या कार्यालयातील मुळ शासन निर्णयाच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.०१.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. मागणीप्रमाणे विहित कालवधीत माहिती मिळाली नसल्याच्या कारण्यावरुन अपीलकाराने दि.१५.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.०३.०३.२००९ रोजी आदेश पारित करुन

प्रथम अपील खारीज केले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वित्त विभागाच्या दि.०६.११.१९८४ व दि.१५.१०.१९८५ च्या शासन निर्णयावर तात्कालीन कार्यालय प्रमुखांनी "माहितीस्तव आवश्यकतेनुसार अनुपालनासाठी सर्वामध्ये प्रसृती करावी" असा शेरा आढळला याबाबत माहिती मागीतली होती.  दि.०६.११.१९८४ च्या शासन निर्णयाची अमंलबजावणी होत नाही असे अपीलकाराचे ग्रा-हाने आहे.  सदर शासन निर्णयाची अमंलबजावणीच्या सद्यस्थितीबाबत अपीलकाराने माहिती मागीतली आहे.  सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई**<br>**दिनांक ३०.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०७८/०२**

**श्री.प्रमोद विनायक सुर्यवंशी**
**सुतारकाम पर्यवेक्षक**
**ठाणे मध्यवर्ती कारागृह,**
**जि.ठाणे ४०० ६०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप महानिरीक्षक**
**कारागृह महानिरीक्षणालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

**जन माहिती अधिकारी,**
**कारागृह महानिरीक्षणालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रमोद सुर्यवंशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०७.२००९ रोजी अर्ज करुन, विशेष वेतन मिळण्यासाठी दि.२५.०७.२००२ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विशेष वेतन मिळण्याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकारास विशेष वेतन मंजूरीबाबत वित्त विभागाची मान्यता घेण्याकरिता त्या विभागाकडे अपीलकाराचे विशेष वेतन मंजूरीचे प्रकरण पाठविण्याबाबत उत्तरवादीने स्वेच्छेने तयारी दर्शविली व तसे आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी विभागाने घेतलेला निर्णय अपीलकारास कळविण्यात यावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०७५/०२**

**श्री.डॉ.मधुकर कनवाडकर**
**चैतन्य निवास, एस.टी.कॉलनी,**
**विश्रामबाग (द) सांगली ४१६ ४१५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, (विशी-४), मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, (विशी-४), मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.डॉ.मधुकर कनवाडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.०१.२००९ रोजी अर्ज करुन, सलग्न वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत वेतनवाढी मंजूर करण्याबाबत दि.०९ जानेवारी, २००८ रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. पुरविलेली माहिती पुसट असून वाचता येत नाही. मुद्येनिहाय परिपूर्ण व समाधानकारक नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२१.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१५.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपिलावरील सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत. अपीलकारांनी उत्तरवादीवर केलेले हेत्वारोप आक्षेपार्ह असून आरोप प्रथम मागे घेतल्या खेरीज अपीलावर पुढील कार्यवाही करणे शक्य होणार नाही असे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तत्कालीन उप सचिव श्री.निंबाद्री रायलापूरकर

यांनी अपीलकारास दि.०९.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कुंठीत वेतनवाढी मंजूर करण्याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.गो.जाधव यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८१/०२**

**श्री. रखमा विठ्ठल गोपाळे**
**एफ-१०५ए दत्तानी पार्क एक्सप्रेस हायवे,**
**कांदीवली (पू), मुंबई ४०० १०१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**
**(पुनर्वसन शाखा), जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**
**(पुनर्वसन शाखा), जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.रखमा गोपाळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०२.२००८ व दि.१६.०४.२००८ रोजी अर्ज करुन, मौजे कमान व बहुल तालुका खेड जिल्हा पुणे येथील कार्यालयाचे आदेश क्र.जिपुअ/चास/३५६/२००३ दि.२३.०९.२००३ बाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अप्पर आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे कार्यालयात रिव्हीजन अपील क्र.पुनर्व / कावी-३/अर्ज /३५/०४ दाखल झाले असून सदर प्रकरणी स्थगिती आदेश दि.२३.०२.२००४ रोजी देण्यात आले आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने प्रथम अपील दाखल न करता अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हे जिल्हाधिकारी, पुणे यांच्या

कार्यालयातील व्हीडीओ कॉन्फन्स रुम मध्ये हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मुळ प्रकल्पग्रस्त श्री.विठ्ठल हरि गोपाळे दि.२२.०८.१९८१ रोजी मयत झाले. त्यांचे वारसाची नोंद १) श्री.नारायण २) हरीभाउ ३) रखमा ४) सावळेराम या मुलांचे नाव गावचे दप्तरी दाखल झाली. वारसांनी स्वतंत्र प्रस्ताव दाखल करुन जमीनी मंजूरी करुन घेतल्या. जमीन स्वतंत्रपणे वहिवाटीत आहे. संकलन रजिस्टर खाते क्र.१६७ प्रमाणे प्रकल्पग्रस्त १.६० हेक्टर जमीन देय असून प्रत्यक्ष ०.३६ आर क्षेत्र सदर प्रकरणी जास्त वाटप झाले. त्यांचा ताबा काढून घेण्यात यावा व ४ वारसमुलाचे नावे आदेश करणे आवश्यक होते असा अहवाल पुनर्वसन अधिकारी यांनी सादर केला. जिल्हाधिकारी, पुणे यांनी पूर्वी प्रदान केलेल्या १ हे ९६ आर जमीनीपैकी ०.३६ आर जमीनीचे वाटप रद्द करुन जादा वाटप केलेली जमीन श्री.सावळेराम विठ्ठल गोपाळे यांना प्रदान केलेल्या जमिनीतून काढून घेउन दि.२३.०९.२००३ रोजी सुधारित आदेश काढले. सदर आदेशास स्थगिती देण्यात आली असून Revision करिता प्रकरण अप्पर आयुक्त, पुणे यांचेकडे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित करणाचा जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पाठपुरावा करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०७४/०२**

**श्री. शांताराम भि.बोधे**
**३०२, हरीपद सोसा.,**
**जय विजय सोसा. जवळ,**
**पारसीवाडा, सहार रोड,**
**विलेपार्ले (पू), मुंबई ४०० ०९९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार, महाबळेश्वर कार्यालय,**
**जि.सातारा ४१२ ८०६.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**तहसिलदार, महाबळेश्वर कार्यालय,**
**जि.सातारा ४१२ ८०६.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शांताराम बोधे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०२.२००९, २५.०२.२००९, १४.०३.२००९ व दि.२५.०३.२००९ रोजी अर्ज करुन, मौजे गोडवली येथील श्री.विनायक शिवराम बिरामणे तसेच सौ.रतन आनंदराव बिरामणे यांच्या मिळकतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्ज तलाठी कार्यालय गोडवली यांचे कार्यालयाशी निगडीत असल्याने उत्तरवादीने सदर अपीलकाराचा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता व सविस्तर माहिती पुरविण्याकरिता संबंधीत गावचे तलाठी गोडवली यांचेकडे पाठविण्यात आले. त्या कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. दि.२६.०३.२००९ च्या अर्जाचे अवलोकन करता अपीलकारास नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही.

म्हणून सविस्तर अर्ज करावा असे उत्तरवादीने अपीलकारास दि.१८.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१०.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.विनायक बिरामणे व श्रीमती.रतन बिरामणे यांच्या मिळकतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास सर्व संबंधीत फाईल/कागदप निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तसेच त्यानंतर आवश्यकतेनुसार निवडक कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास देण्यात येतील असे आयोगासमोर उत्तरवादीने प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून सर्व संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करावे. त्यानंतर आवश्यकती माहिती उत्तरवादीकडून प्राप्त करुन द्यावी.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८६/०२**

**श्री. जितेंद्र भिमाले**
**४३२, गुरूवार पेठ, गौरी आळी चौक,**
**पुणे ४११ ०४२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)**
**५ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)**
**५ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जितेंद्र भिमाले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१२.२००७ रोजी अर्ज करून, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१. दि.०१.०१.२००७ ते हा अर्ज निकाली काढेपर्यंतच्या तारखेपर्यंत मा.मंत्री महोदयांनी, महाराष्ट्र शासनाने ताडी दुकानांच्या व ताडी नमुने चाचणी विषयासंदर्भात आलेल्या सर्व अर्ज पुनरिक्षणे अपील इ. कागदपत्रे व त्यावर दिलेले आदेश निर्णय या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती देणेची विनंती आहे.

२. मुंबई दारूबंदी कायदा १९४९ खाली तयार झालेल्या नियमानुसार विविध अनुज्ञप्तीच्या व्यवहाराच्या वेळा पुढीलप्रमाणे आहेत का?

सी एल-३ सकाळी १० ते रात्री १२

एफ एल-२ सकाळी १० ते रात्री ८.३०

एफ एल-३ सकाळी ११.३० ते दुपारी ३.००

व संध्या ६.३० ते रात्री ११.००

ट.डी-१ सकाळी ७ ते रात्री १०.००

अशा या वेगवेगळ्या वेळा ठेवण्यामागे महाराष्ट्र शासनाचे ध्येय-धोरण, उद्‌देश काय आहे? एल एल-२ अनुज्ञप्तीची वेळ रात्री ८.३० ऐवजी सी एल-३ प्रमाणे रात्री १२.०० पर्यंत का वाढवून दिली जात नाही?

जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुध्दा क्र.१ बाबत रु.८/- इतके भरल्यानंतर माहिती देण्याची तयारी दर्शविली. तसेच अर्जातील मुध्दा क्र.२ जन माहिती अधिकारी, रा.उ.शु-२ गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी संबंधीत असल्याने अर्जाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी त्यांचेकडे हस्तांतरित केली. तसे अपीलकारास दि.०७.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. दि.०७.०३.२००८ च्या पत्रान्वये मुध्दा क्र.१ बाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे सर्व कागदपत्र उपलब्ध करून दिली नाहीत. म्हणून अपीलकाराने दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०९.०४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करून दिलेल्या माहितीचे समर्थन करून दि.०७ मे, २००८ रोजी आदेश पारित करून प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, ताडी दुकानाच्या व ताडी नमुने चाचणी संदर्भात माहिती मागीतली होती. जन माहिती

अधिकारी तथा अवर सचिव श्री अविनाश साबळे यांनी अपीलकारास माहिती पुरविली. मुध्दा क्र.२ माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. सदर माहिती संबंधीत अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे उपलब्ध होउ शकेल म्हणुन अपीलकाराचा अर्ज संबंधीत अधिक्षकाकडे दि.३१.०१.२००७ च्या पत्रान्वये पाठविला असल्याचे उत्तरवादीने अपीलकारास दि.१२.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी कार्यासनात उपलब्ध असलेल्या पुनरिक्षण अर्जावरील आदेशाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली आहे. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक नियमानुसार कार्यवाही केली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१६.०६.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२३८/०२**

**श्रीमती. पं.ग.कोदरकर**
**श्री.दे.म.अकोलकर**
**३३ (अ), रेणुका, छत्रपती नगर,**
**गारखेडा परिसर, औरंगाबाद ४३१ ००५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**१६ अ, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**१६ अ, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती. प.गं.कोदरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.११.२००८ रोजी अर्ज करुन,

१. शासनाने सा.प्र.वि.चे परित्रक क्र.न्याय २००३/९९ प्र.क्र.२/०३ (भाग-२)/१६-अ, दि.२५.१०.२००५ मध्ये सा.प्र.वि.च्या दि.१२.१०.१९६५ आणि दि.०४.०३.१९९१ चा उल्लेख केलेला नाही. तेव्हा शासनाने हि दोन्हीही पत्रिपत्रके रद्द केली असल्यास त्याबाबतचे शासनाचे पत्र.

२. शासनाने सा.प्र.वि चे परिपत्रक दि.१२.१०.१९६५ आणि ०४.०३.१९९१ हा अंशत: रद्द केला/ त्यातील काही सवलती चालु ठेवण्यात आणि काही रद्द केल्यात याबाबतच्या सुचनाचे शासनाचे पत्र.

३. शासनाच्या सा.प्र.वि.दि.२५.१०.२००५ मध्ये दि.१२.१०.१९६५ आणि ०४.०३.१९९१ च्या उल्लेख नसल्याने स्वा.सै.अवलंबितांचा सा.प्र.वि च्या दि.३१.०३.१९९३ नुसार फक्त पसंती क्रमानुसारच विचार करावा याशिवाय अन्य सवलती, वयाअदिचा आर्दाच्या सा.प्र.वि. परिपत्रक दि.१२.१०.१९६५ व ०४.०३.१९९१ नुसार विचार नियोक्ती अधिका-यांनी करु नये वा करावा याबाबत शासनाचे जे काय आदेश असतील त्याची प्रत.

४. बरेच नियोक्ते जाहीरातील स्वा.सै. अवलंबितांचा उल्लेखच करीत नाही/ त्यांची माहिती अर्जाव्दारे मागवित नाहीत तरी त्यांनी सा.प्र.वि. च्या दि.२५.१०.२००५ मधील मार्गदर्शक तत्वाचे पालन केले असे गृहीत धरले जाते वा शासन निर्देशाचा भंग केला म्हणुन ती / संबंधीत जाहीरात रद्द समजण्यात येउन नियोक्त्यास शासित करण्यांत यावे याबाबत शासननिर्देश असल्यास त्याची प्रत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२७.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पुन्हा दि.०४.०२.२००९ च्या पत्राची प्रत अपीलकारास पाठविली. माहिती अधिका-यांनी सविस्तर माहिती दिली असल्याचे दि.१६.०३.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. मागीतलेली माहिती न देता आवांतर माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित अपीलकाराचे प्रतिनिधी औरंगाबाद येथील व्हीडीओ कॉन्फरन्सींग रुममध्ये हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, स्वातंत्र सैनिकाचे नामनिर्देशनाबाबतच्या परिपत्रकाबाबत स्वतंत्र्य सैनिकाच्या सवलतीबाबत माहिती मागीतली होती. संबंधीत माहिती, जन माहिती अधिका-यांनी

दि.१७.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास पुरविली आहे. स्वातंत्र्य सैनिकांना शासकीय सेवेत नियुक्तीसाठी सवलती देणेबाबत दि.१२.१०.१९६५, दि.०४.०३.१९९१ तसेच दि.२५.०८.२००८ चे आदेश आहेत. अपीलकारास नामनिर्देशनाने शासकीय सेवेत नियुक्ती करण्याची मागणी आहे. नामनिर्देशनाने अपीलकाराची नेमणूक करणे शक्य नाही. विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्वातंत्र्य सैनिकाची पदे भरणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १८.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२७५/०२**

**श्री.मधुकर सांभाजीराव वाघमारे**
**गणेश नगर, गेवराई ता.गेवराई,**
**जि.बिड, ४३१ १२७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**महसूल व वन विभाग,**
**(महसूल) ई-५,**
**१६ अ, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**(महसूल) ई-५,**
**१६ अ, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मधुकर वाघमारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१. जिल्हाधिकारी बीड यांचे पत्र क्र.२००५ /आरबी/डेस्क-१/ ईएसडी/कावि/१४६, दि.१०.०४.२००६ या पत्राची नक्कल व हे पत्र आपणास कोणत्या तारखेस मिळाले त्याची माहिती.

२. विषयांकित पत्र ज्या तारखेला आपणास मिळाले तेव्हापासून त्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर केलेल्या कार्यवाहीच्या सर्व पत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

३. माहितीच्या संबंधीत कालावधीत कार्यरत असणा-या १) कनिष्ठ सहाय्यक, २) कक्ष अधिकारी ३) उप सचिव ४) सचिव या पदावर असणा-या सर्वांचे (सर्व्हीस बुक) सेवापटाचे

पहिले पान ज्यामध्ये लोकसेवकांची एक ते दहा (१०) मुद्यांवर माहिती अद्यावत असते, त्याच्या सर्वांच्या प्रती मिळाव्यात.

जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी श्री.च.गु.गोवेकर यांनी अपीलकारास दि.२३.०३.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. उत्तरवादीकडून दि.१०.०४.२००६ च्या पत्राची नक्कल प्राप्त झाली. परंतू सदरचे पत्र किती तारखेला मिळाले ही माहिती देण्यात आली नाही. सेवापटाची माहिती दिली नाही. मुध्दा क्र.२ ची माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.२०.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. दि.०६.०७.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.१०.०४.२००६ च्या पत्राची नक्कल, सदर पत्र प्राप्त झाल्याची तारिख व सेवापटाची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी कार्यासनात उपलब्ध असलेली माहिती उत्तरवादीने अपीलकारास पुरविली आहे. यामुळे अपीलकाराचे समाधान झालेले नाही. सर्व संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरिता संबंधीत फाईल अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्राचे निरीक्षण करावे.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२७२/०२**

**श्री.देशमुख मोईन अब्दुल लतीफ**
**घर नं.१०/८ गजानन हौसिंग सोसा,**
**जुना मुकुंदनगर, औरंगाबाद रोड,**
**अहमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**संचालक यांचे कार्यालय,**
**आरोग्य सेवा ५ वा मजला, आरोग्य भवन,**
**सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**संचालक यांचे कार्यालय,**
**आरोग्य सेवा ५ वा मजला, आरोग्य भवन,**
**सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.देशमुख मोईन अब्दूल लतिफ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०७.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने स्वत: दि.२३.०६.२००९ रोजी जन माहिती अधिका-याच्या कार्यालयात, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर येथील भ्रष्टाचारी कर्मचारी श्री.संजय ठोंबरे यांच्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रार अर्जावर संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशिल मागीतला होता. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दि.२५.०५.२००९ च्या आदेशानुसार प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्यचिकीत्सक सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांना अपीलकारास विनामुल्य माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात आले

असल्याचे संचालक, आरोग्य सेवा यांनी दि.०७.०८.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२०.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.संजय ठोंबरे यांच्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी यापूर्वीच राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, औरंगाबाद यांनी सुनावणी घेउन अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत दि.२५.०५.२००९ रोजी आदेश पारित केले आहेत. पंरतू अद्याप अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची सदर कृती निश्‍चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३२३९/०२**

**श्री. भुपेश माहेनलाल राठोड**
**११०७, मेकर चेंबर्स ५,**
**व्ही.नरीमन पॉईंट,**
**मुंबई ४०० ०२१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-१२, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकून व्हिलेज,**
**कांदीवली (पू), मुंबई.**

**.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.भुपेश राठोड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खटला क्र.१०७६/एस एस/२००८ मधील दगडू एस.लगाडे व विजय डी.लगाडे यांचेविरुध्द अजामिनपात्र वारंट अनुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास दि.१६.०२.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती पुरविली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलमाचा गैरवापर करुन उत्तरवादी माहिती पुरविण्यास टाळाटाळ करत आहेत. म्हणून अपीलकाराने दि.१६.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलवरील सुनावणीला हजर राहत नाहीत. उत्तरवादीने अपीलकारास विहित कालावधीत दि.२७.०२.२००९ रोजी माहिती पुरविली असल्याचे नमुद करुन दि.२६.०५.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. अपूरी माहिती दिली. काही मुद्याची माहिती नाकारली.

संपूर्ण माहिती हवी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, खटला क्र.१०७९/एस एस/२००८ बाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक नियमानुसार अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.२७.०२.२००९ च्या पत्रान्वये पुरविली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०५.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०७२/०२**

**श्री. शांताराम भि.बोधे**
**३०२, हरीपद सोसा.,**
**जय विजय सोसा. जवळ,**
**पारसीवाडा, सहार रोड,**
**विलेपार्ले (पू), मुंबई ४०० ०९९. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त**
**पुणे महानगरपालिका, पुणे**
**ढोले पाटील रोड, क्षेत्रीय कार्यालय,**
**क्र.२, पुणे ४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**पुणे महानगरपालिका, पुणे**
**ढोले पाटील रोड, क्षेत्रीय कार्यालय,**
**क्र.२, पुणे ४११ ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शांताराम बोधे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.११.२००८ रोजी अर्ज करुन, पुणे पेठ कल्याणनगर स.न.२११ अ प्लॉट क्र.६१, प्लॉट क्र.३ + ३ अ निलांजली सोसा, कल्याणीनगर येरवडा येथील मिळकतीतील काही सदनिकांचे विद्यमान मालक व ते भरत असलेला मिळकतकर आणि लोकशाहीदिनी आयुक्त यांनी दिलेला आदेश इत्यादि माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास माहिती पुरवावी असे दि.२०.०३.२००९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, पुणे महानगरपालिका यांनी दि.०१.०९.२००९ च्या पत्रान्वये

अपीलकारास माहिती पोटी रु.४०/- इतके शुल्क भरण्याबाबत कळविले. अपीलकाराने शुल्क भरले नाही. कार्यालयाकडे फिरकले नाहीत. त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

विषयांकित ठीकाणी अस्तीत्वातील पार्ट जुने बांधकाम पाडून नवीन बांधकामाचे नकाशे मान्य करण्यात आले. विकासकानी जुन्या इमारतीचे पाडकाम सुरु केल्यामुळे लागतच्या इमारतीला चिरा व भेगा गेल्याने पावसाचे पाणी भिंतीत मुरुन, प्लॉटमध्ये गळत असल्याबाबत तक्रार अर्ज दाखल झाला. जुन्या इमारतीचे पाडकाम थांबविणेबाबत कळविल्यानुसार इमारतीचे पाडकाम थांबविण्यात आले असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०७३/०२**

**श्री. शांताराम भि.बोधे**
**३०२, हरीपद सोसा.,**
**जय विजय सोसा. जवळ,**
**पारसीवाडा, सहार रोड,**
**विलेपार्ले (पू), मुंबई ४०० ०९९. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी**
**पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद,**
**मु.पो.पांचगणी,**
**जि.सातारा ४१२ ८०५.**

**जन माहिती अधिकारी,**
**पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद,**
**मु.पो.पांचगणी,**
**जि.सातारा ४१२ ८०५. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शांताराम बोधे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०५.२००९ रोजी अर्ज करून, सन २००२ ते २००५ या कालखंडात किती अनधिकृत बांधकामे झाली. या कालावधीत किती बांधकामावर कारवाई केली इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००९ रोजी मुध्देनिहाय माहिती पुरविली. दि.१९.०२.२००९ च्या अर्जाबाबत दि.०६.०३.२००९ च्या पत्रान्वये पुर्वीचे माहिती पुरविली. अपीलकाराने वेळोवेळी उत्तरवादीकडे माहितीच्या अधिकारात अर्ज केला. अर्जदारास प्रत्येक अर्जावर विहित कालावधीत उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरील दिसून येते. यामुळे समाधान झाले

नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलातील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकारांनी वेळोवेळी दि.०९.०२.२००९, १६.०३.२००९, ०६.०५.२००९, ०२.०६.२००९, १९.०६.२००९, २९.०६.२००९ रोजी माहितीच्या अधिकारात उत्तरवादीकडे अर्जे दाखल केली होती. सदर अर्जावर उत्तरवादीने विहित कालावधीत अपीलकारास माहिती पुरविली. त्यानंतर समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीले दाखल केली. प्रत्येक प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले आहेत. अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/३१२/०२**
**तक्रार क्र.२०१०/३१३/०२**

**श्री.शशिकांत रा.पाटील**
**म्युन्सि चाळ, ४५ के.एफ.खोली क्र.३,**
**लालबाग मासळी मार्केट,**
**श्री गणेश नगर, मुंबई ४०० ०१२.** **.... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकी अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग,**
**डॉ.बी.ए.रोड, परळ नाका, परेल, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.शशिकांत रा.पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०१.२००९ दि.१९.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन श्री.मारूती नारायण जाधव (मनपा भाडेकरु) यांच्या खोली क्र.२ मध्ये पोटभाडेकरुन ठेवला असून त्याचा त्रास होत असल्याचे निवेदन तक्रारदार श्री.शशिकांत पाटील यांनी लोकशाही दिली बृहन्मुंबई महानगरपालिकेत दि.०१.०३.२००४ रोजी सादर केले होते. त्याची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. याबाबतचा जुना पत्रव्यवहार कार्यालयात उपलब्ध नसल्याने माहिती नाकारली होती. जुना पत्रव्यवहार का उपलब्ध होत नाही याबाबत तक्रारदाराने खुलासा मागीतला होता. याबाबत गैरतक्रारदाराने माहिती दिली नाही. म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय

अपील क्र.२००८/१३३३/०२ दाखल केले होते.  सदर अपीलावर सुनावणी आयोजित करण्यात आली होती.  "गैरतक्रारदाराने संबंधीत कागदपत्राचा पुन्हा जाणिवपूर्वक शोध घ्यावा.  त्यानंतर संबंधीत कागदपत्र सापडली नाही तर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जाणिवपूर्वक निर्णय घेउन तक्रारदारास वस्तुस्थिती १५ दिवसाचे आत कळवावी" असे दि.१८.१२.२००८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

अपील क्र.२००८/१३३८/०२ दि.१८.१२.२००८ च्या आयोगाच्या आदेशात निर्देशित केल्याप्रमाणे चौकशी अधिका-याकडून श्री.मारुती नारायण जाधव आणि सोनाबाई कदम यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिका कलम १०५ ब अन्वये दाखल केलेली चौकशी क्र.४/एफ/द/२०४ बाबतचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती व चौकशी बंद करण्याबाबतचे चौकशी अधिकारी (विधी) यांचे आदेश यांच्या छायाप्रती दि.०७.०१.२००९ च्या पत्रानुसार, तक्रारदारास, गैरतक्रारदाराने पुरविल्या.  परंतू अपील क्र.१३३३ ची माहिती तक्रारदारास मिळाली नाही.  यामुळे क्र.३१२ व ३१३ हया तक्रारी दाखल केल्या आहेत.  जुना पत्रव्यवहार पुन्हा कसून शोध घेउन सुध्दा उपलब्ध होउ शकला नाही त्यामुळे माहिती देता आली नाही असे लेखी अहवाल गैरतक्रारदार श्री.प्रकाश मानकामे, प्रशासकीय अधिकारी (प्र) व श्री अप्पासाहेब माने, भाडे पर्यवेक्षक (प्र) यांनी आयोगास सादर करुन प्रतिपादन केले.  यावरुन गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे दिसून येते.  या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३०.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३५२२/०२**

**श्री. विश्वास वसंत ताम्हणकर**
**टागोर नगर, चाळ क्र.१५६,**
**खोली क्र.२५८५ ग्रुप क्र.५/ब,**
**विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त**
**पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालय.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
**पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालय.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विश्वास ताम्हणकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील कार्यरत पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, पदावरील अधिकारी व अंमलदार यांचे विरुध्द वर्तणूक यासबबी खाली खात्यामार्फत प्रारंभिक चौकशी व तपास व विभागीय चौकशी व निलंबन, सेवेतुन कमी, सक्तीने निवृत्त, सेवेतून बडतर्फे याबाबतीची कारवाई करण्यासाठी कार्यपध्दती पोलीस खात्यासाठी कोण, कोणत्या स्वतंत्र चौकशीची नियम, अधिनियम, प्रचलित कायदयान्वये कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचे शासनाचे व गृहविभाग व पोलीस विभागाचे पुस्तीका आहेत. पोलीस दलातील वर्तणूकीबाबत नियमावली, अधिनियम, कोणकोणत्या आहेत त्याची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावीत अधिकृत प्रशासकीय

कार्यपध्दतीबाबतच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात व अनुषंगीक एकूण १८ मुद्यांवर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१७.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्याने विहित मुदतीत न देता दि.०७.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली ती योग्य आहे. असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विलंबाने पुरविली असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उत्तरवादीने अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाच्या आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/४९५/०२**

**श्री.संजय नटवरलाल लोहार**
**२५/अ, पाटकरनगर, ड्रायव्हर्शाजवळ,**
**देवपूर, धुळे. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समिती,**
**खोली क्र.३०५, ३ रा मजला,**
**शासकीय तंत्रनिकेतन इमारत,**
**खेरवाडी, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.संजय लोहार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालय, नगाव ता.धुळे यांनी शैक्षणिक शुल्कात वाढ केली याबाबत तसेच शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांना ५ व्या वेतन आयोगाचा लाभ देण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. शैक्षणिक शुल्क वाढवून देण्यात आले तरी संस्थेने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार अपीलकाराला वेतनश्रेणी लागू केली नाही. याबाबत तक्रारदाराने मागणी केलेल्या माहितीबाबत संस्थेकडे संपर्क साधण्याबाबत गैरतक्रारदाराने कळविले होते. अपीलकाराने मागणी केलेली माहिती

गैरतक्रारदार तथा शैक्षणिक शुल्क समितीने पुरविणे आवश्यक होते. परंतू तक्रारदारास माहिती मिळाली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील क्र.२००९/२७४९/०२ सादर केले होते.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने, तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३०.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन दि.१२.०७.२००९ रोती तक्रारदाराने आयोगाकडे क्र.४९५/०२ ही तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगास प्रतिपादन केले की, तक्रारदाराच्या मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली. आयोगाच्या आदेशाचे पालन केले. कार्यालयातील सर्व संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता तक्रारदारास उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली असल्याचेही गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरिता उपस्थित होते. सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाची अमंलबाजवणी करण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/१८३९/०२**

**श्री. चंद्रकांत कोंडिबा प्रभाळे**
**चुनावाला ४२/६,**
**साईनाथ चौक सर्वेश्वर मार्ग,**
**कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यकअभियंता**
**(इमारत व कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चंद्रकांत प्रभाळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. माहितीपोटी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी रु.२, ६००/- इतके शुल्क भरण्याबाबत कळविले होते. माहिती किती पानाची आहे, याबाबत अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे तपशिल मागीतला असता त्यांना तपशिल दिला नाही असे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. याबाबत तपासणी करता आली नाही. कारण जन माहिती अधिकारी व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते.

अपीलकारास माहिती पुरविण्याकरिता रू.२, ६००/- इतके शुल्क आकारण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी सदर शुल्काची गणना कशी केली. माहिती किती पानाची आहे. रू.२,६००/- शुल्क कसे येते. याबाबत सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता श्री.नाखवा यांनी अपीलकारास १५ दिवसात पुरवावी असे आयोगाने व्दितीय अपील क्र.२००९/१८३९/०२ बाबत दि.१६.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. अन्यथा जन माहिती अधिका-यांनी आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही तर, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिकारी श्री.नाखवा यांच्या विरुध्द शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल असेही दि.१६.०४.२००९ च्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांना आदेशित केले होते.

कागदपत्राच्या प्रती देण्याबाबत योग्य आकार न लावता व त्याबाबतचा खुलासा / तपशिल अपीलकार श्री.प्रभाळे यांना न देता जन माहिती अधिकारी श्री.नाखावा यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येते. श्री.नाखवा यांनी आकारणी केलेल्या शुल्काबाबत, सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांनी त्यांचे स्पष्टीकरण मागीतले होते. याबाबत श्री.नाखवा यांच्याकडून स्पष्टीकरण प्राप्त झाले नसल्याचा सहाय्यक अभियंता यांनी दि.३०.०५.२००९, ०३.०६.२००९ रोजी आयोगास लेखी अहवाल सादर करुन कळविले आहे. तसेच श्री.नाखवा यांच्या सदर गैरवर्तनाबाबत त्यांच्या पगारातून रू.१०००/- एवढी रक्कम शास्ती म्हणनू वसूल करण्याचे प्रस्तावीत करण्यात आलेले आहे व तशी नोंद त्यांच्या सेवाअभिलेखात घेण्यात येणार असल्याचाही सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे. अपीलकारास हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती दि.०३.०२.२००९ रोजी पोच देय डाकेने पाठविण्यात आल्या असल्याचेही आयोगास कळविले आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा दुय्यक अभियंता श्री.नाखवा यांनी आयोगाच्या दि.१६.०४.२००९ च्या आदेशाची अमंलबजावणी केली नाही. आयोगास/कार्यालयास याबाबत लेखी खुलासा सादर केला नाही. अपीलकार श्री.प्रभाळे यांना माहिती पुरविण्याकरिता रु.२,६००/- इतके अवाजवी शुल्क भरण्यास कळविले. किती पानाची माहिती पुरविणार याबाबतची माहिती मागूनही अपीलकारास पुरविली नाही. जन माहिती अधिका-याच्या सदर प्रमादाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार रु.५०००/- इतकी शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका एल विभाग कार्यालयाने जन माहिती अधिका-याच्या वेतनातून समान ५ हप्त्यात वसूल करावी. सदर शास्तीची वसूली माहे फेब्रुवारी, २०१० पासून सुरु करावी. वसूल केलली शास्तीची रक्कम लेखाशिर्ष क्र.००७, इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या लेखाशिर्षाखाली चलनाने शासकीय कोषागारात जमा करावी. चलनाच्या प्रती आयोगाकडे सादर कराव्यात.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०५२/०२**
**अपील क्र.२०१०/४०६१/०२**
**अपील क्र.२०१०/४०६२/०२**

**श्री.उत्तम सांळुखे**
**१/३ सिध्देश्वर को.हौ.सोसा.,**
**कामगार नगर रोड, कुर्ला (पु),**
**मुंबई ४०० ०२४. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक**
**पाटण पोलीस स्टेशन, पाटण,**
**मु.पो.पाटन, ता.पाटण, जि.सातारा.**

**जन माहिती अधिकारी,**
**ढेबेवाडी पोलीस स्टेशन मु.पो.ढेबेवाडी,**
**ता.पाटणा, जि.सातारा. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.उत्तम सांळुखे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.१२.२००८ रोजी अर्ज करून, मु.करपेवाडी पो.मानेवाडी ता.पाटण जि.सातारा येथील पोलीस पाटलांनी अपीलकाराच्या नावे असलेल्या मिळकत सर्व्हे क्र.१०१ मधील बाभळीच्या झाडासंबंधी पोलीस स्टेशनला केलेला तक्रार अर्ज व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशीलावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. त्यानुसार अपीलकारास दि.०३.०३.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, बाभळीच्या झाडासंबंधी पोलीस स्टेशनला केलेल्या तक्रार अर्जासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे तसेच करपेवाडी गावातील तंटा मुक्ती समितीच्या निर्णयानुसार कारवाई केली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तंटा मुक्ती समितीने सदर प्रकरणी निर्णय घेतांना उपस्थितांची अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली. गाव पातळीवरील तंटा मुक्ती समितीच्या सदस्यांची यादी पुरवावी अशी अपीलकाराची मागणी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत करपेवाडी गावातील तंटा मुक्ती समितीवरील सदस्यांच्या नावाची यादी अपीलकारास निशुल्करित्या पुरवावी.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३१९३/०२**

**श्री.रमेश मधुकर साळवे**
**सुरजी वल्भदास चाळ,**
**(शिवशंकर प्रसाद चाळ),**
**विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख (पुनर्वसन व पुर्नवसाहत)**
**एम.एम.आर.डी.ए,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स,**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक**
**एम.एम.आर.डी.ए,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स,**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रमेश मधुकर साळवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. एमएमआरडीए प्राधिकरणात सामाजिक कार्य करणारी सेवाभावी संस्था स्पार्क महाराष्ट्र शासन अधिन नोंदणीकृत आहे किंवा नाही तसेच स्पार्क ही संस्था महाराष्ट्र शासन अधिन नोंदणीकृत असल्यास त्याची नोंदणी दिनांक व नोंदणी क्रमांक मिळणेबाबत.
२. सेवाभावी स्पार्क ही संस्था माहिती अधिकार अधिनियमाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास बांधील आहे किंवा नाही? याबाबत मला सविस्तर माहिती मिळणे हेतु.

स्पार्क ही संस्था नोंदणीकृत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.३१.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२३५३/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी ४५ दिवसाचे आत प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करुन उचित आदेश पारित करुन याबाबत अपीलकारास अवगत करावे असे आयोगाने दि.२७.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सेवाभावी स्पार्क ही संस्था माहिती अधिकार अधिनियमाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास बांधील आहे किंवा नाही? याबाबत अपीलकारास माहिती मिळाली नाही असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ उप कलम (ज) मध्ये सार्वजनिक प्राधिकरण बाबत स्पष्टीकरण दिले आहे. कलम २ (ज) (घ) (एक) (दोन) अनुसार शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा शासनामार्फत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी संघटना / निकाय, संस्था माहितीच्या अधिकार

कक्षेत येतात.  सेवाभावी संस्थेस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शासनामार्फत वित्त पुरवठा केला जात नसेल तर सेवाभावी संस्था / Trust माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाहीत.  अपीलकाराने प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती मागीतली असल्याने उत्तरवादीने अपीलकारास उत्तर दिल्याचे दिसून येत नाही. सार्वजनिक प्राधिकरणाबाबत उक्त अधिनियमातील कलम २ मध्ये व्याख्या देण्यात आली आहे.  या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/४९१/०२**

**श्री.आठवले अशोक कचरू**
**कांबळे निवास, यशवंतराव चव्हाण नाटयगृहासमोर**
**आनंदनगर, नगररोड, (कॅनॉल रोड),**
**ता.जि.बीड. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**समाजिक न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.आठवले अशोक कचरू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, राज्यातील आयुक्त अपंगकल्याण यांच्या कक्षेतील सर्व अपंग संस्थेत कार्यरत असलेल्या सर्व संवर्गनिहाय कर्मचा-यांची सूची, वय, जात, लिंग इत्यादि एकूण ७ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहितीचे मोठया प्रमाणात असलेले स्वरूप लक्षात घेता तक्रारदाराच्या अर्जाची प्रत सर्व समाजकल्याण अधिकारी, गट अ जिल्हापरिषद, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांना पाठवून तक्रारदारास माहिती पुरविण्याबाबत तक्रारदारास गैरतक्रारदाराने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे क्र.२००९/२५१५/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसात माहिती पुरवावी असे आयोगाने व्दितीय अपील क्र.२००९/२५१५/०२

बाबत दि.२७.०५.२००९ रोजी आदेश पारित केले.  त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे क्र.४९१/०२ ही तक्रार दाखल केली.

तक्रारदारास माहिती मिळाली नसल्याचा मुध्दा तक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी उपस्थित केला.  गैरतक्रारदाराने असे प्रतिपादन कले की, तक्रारदाराच्या अर्जाची प्रत सर्व संबंधीत प्राधिकरणाकडे पाठवून अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत शासन स्तरावरुन कळविलेले आहे. संबंधीतांकडून अपीलकारास माहिती पुरविण्यात येत असल्याचे दिसून येते.  अपीलकारास पाठविलेल्या माहितीच्या पत्राची प्रत गैरतक्रारदाराकडे संबंधीताकडून पाठविण्यात येतात असे गैरतक्रारदाराने आयोगास सांगीतले.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३९९३/०२**

**श्री.के.अशोक रेड्डी उर्फ मुरली**
**न्यायालयीन बंदी क्र.३४७८,**
**अधिक्षक नागपूर,**
**मध्यवर्ती कारागृह, नागपूर,**
**जि.नागपूर.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**(विशेष), गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.के.अशोक रेड्डी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०६.२००८ रोजी अर्ज करुन, एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतल होती. अपीलकार एक वर्षापासून नागपूर मध्यवर्ती कारागृहात बंदी आहे. नागपूर कारागृहात अपीलकार दि.०७.०४.२००८ ते ०३.०५.२००८ या कालावधीत विविध मागण्याकरिता उपोषणास बसले होते. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली. अपीलकाराने अर्जावर विहित शुल्काचे कोर्ट फी स्टँम्प लावले नाहीत. म्हणून दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर करावा असे कक्ष अधिका-यांनी अपीलकारास दि.०९.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली

नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार नागपूर मद्यवर्ती कारागृहात बंदी असल्याने ते गैरहजर होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास निशुल्क माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९५/०२**

**श्री.नामदेव भागुजी तातळे**
**गुरू कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**पडवळचाळ आनंदगड पार्कसाईट,**
**विक्रोळी, मुंबई ४०० ०७९.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कमलादेवी यात्रा उत्सव सचिव,**
**मु.उगलेवाडी, पो.शिनाली,**
**ता.आबेगांव, जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**कमलादेवी यात्रा उत्सव सचिव,**
**मु.उगलेवाडी, पो.शिनाली,**
**ता.आबेगांव, जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.नामदेव तातळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०८.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. श्री.कमलादेवी यात्रा उत्सव कमिटी वर्षे २००७ ते २००८ वर्षाचा ताळेबंद अहवाल त्यावर्षाची बँक शिल्लक जमा-खर्च अहवाल बँक पासबुकाची संपुर्ण छायाप्रत व पावती बुके साक्षांकित छाया प्रत किती बुके छापली आहेत. २००७ ते २००८ वर्षापर्यंत त्याची सत्य छायाप्रत खर्च बिले २००७ ते २००८ पर्यंत छाया प्रत सविस्तर सत्य माहिती जनतेसाठी मिळावी.

२. ग्रामस्त (गाव घरची) वर्गणी २००७ ते २००८ पर्यंतची कामगार वर्ग, पुणे मुंबई (वर्गणी /देणगी) किती वर्गणी वसुली करण्यात आली (जमा) जमा बुक २००७ ते २००८ पर्यंत जमा सत्य छायाप्रत पावती पुस्तके त्यामुध्ये अनुक्रमांक दिले आहे काय सविस्तर माहिती मिळावी.

३. २००७ ते २००८ पर्यंत सार्वजनिक कार्य / उत्सवासाठी /धार्मिक व धर्मादाय कार्यासाठी वर्गणी गोळा करण्यासाठी पुणे सार्वजनिक विश्वस्त व्यवस्ता अधिनियम, १९५० चे कलम ४१ (क) अन्वये मा.धर्मादाय सह आयुक्त कार्यलयाची पुर्ण परवानगी घेतली आहे काय किंवा ट्रस्ट (मंडळ) नोंदणी केली आहे काय सत्य माहिती द्यावी. परवानगी घेतली असल्यास नोंदणी प्रमाण पत्र छायाप्रत व वर्गणी मिनीट बुक २००७ ते २००८ छायाप्रत कृपया मिळावी.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१९.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.कमलादेवी यात्रा उत्सव कमिटीबाबत एकूण ३ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी

असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३९९४/०२**

**श्री.बाबूराव या.गायकवाड**
**बिल्डींग नं. अ-९, प्लॅट नं.१०२,**
**शांती विहार मिरा रोड (पू),**
**ठाणे ४०१ १०७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर,**
**जि.नागपूर.**

**जन माहिती अधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर,**
**जि.नागपूर.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.नामदेव तातळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१०.२००८ रोजी अर्ज करुन, अपीलकाराचे वडिल कै.यादवराव फागोजी गायकवाड यांच्या मृत्यू दाखलाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली. मृतक यादवराव फागोजी गायकवाड मृत्यू दि.२८.०७.२००९ यांच्या मृत्यूच्या नोंदीची संगणकात तपासणी केली असता मृत्यूची नोंदणी आढळली नाही. मृत्यूचा दाखला मिळविण्याकरिता रु.२०/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र दिल्यास मृत्यूचा दाखल देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येत नाही. अपीलकाराने केंद्रीय सूचना आयोगाकडे अपील केले. केंद्रीय सूचना आयोगाने सदर प्रकरण दि.२८.०२.२००९ च्या पत्रासोबत पुढील आवश्यक कारवाईकरिता राज्य माहिती आयोगाकडे हस्तांतरित केले.

सदर अपीलावर दि.२१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याने ती अपीलकारास पुरविता येत नाही असे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. उत्तरवादीचा खुलासा लक्षात घेता या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३९८८/०२**

**श्री.तारांचद अ.मुलमुले**
**समता कॉलनी, नागभीड,**
**पो.व.ता.नागभीड, जि.चंद्रपूर.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी**
**ब्रम्हपूरी ता.ब्रम्हपूरी,**
**जि.चंद्रपूर.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक**
**पोलीस स्टेशन, नागभीड,**
**ता.नागभीड, जि.चंद्रपूर.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.ताराचंद्र मुलमुले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०३.२००९ रोजी अर्ज करुन, कायदा व सुव्यवस्था बाबत एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. अर्जातील मुध्दा क्र.१ ते ३ आणि ५ व ६ ची मागणी माहिती अधिका-यांनी फेटाळली असल्याने अपीलकाराने दि.२०.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कायदा व सुव्यवस्थाबाबत माहिती मागीतली होती. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचे कार्यालयात अपीलकाराने दिलेल्या अर्जाची चौकशी करुन चौकशी अहवाल मुळ कागदपत्रासह पोलीस स्टेशन जा.क्र.२३२८/०८, दि.११.०८.२००८ प्रमाणे अहवाल सादर करण्यात आला. पोलीस स्टेशनला उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास दि.०८.०५.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिली. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३५०६/०२**

**श्री.सदानंद बापू खडपे**
**ऑफिस बिल्डींग १८, रुम नं.२,**
**नियर बि.न.१३५ च्या बाजूला,**
**कन्नवार नं.२, विक्रोली (पू),**
**मुंबई ४०० ०८३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**पहिला मजला, खोली क्र.२०२,**
**गृहनिर्माण विभाग, कला नगर,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (३),**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**पहिला मजला, खोली क्र.२०२,**
**गृहनिर्माण विभाग, कला नगर,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सदानंद खडपे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०७.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

गाळेधारक म्हाडा कर्मचारी आहेत. त्यांचे गाळे मालकी तत्वावर मुंबई मंडळाने दिले आहेत. गाळा क्र. १) वसंत रामचंद्र मयेकर यांना ३६, ०००/- रुपयात अभिहस्तांतर १९९५ मध्ये देण्यात

आला, गाळा क्र.२) सदानंद बापु खडपे यांनी रू.३, ६२, ६३७/- भरुन दि.१०.०७.२००८ पर्यंत अभिहस्तांतरण करुन दिलेला नाही, तो अभिहस्तांतर करुन देण्याची कृपा करावी.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

कार्यालयीन इमारतींमधील दोन गाळे असताना एक गाळा अभिहस्तांतरण करुन दुसरा गाळा अभिहस्तांरण पासुन वगळण्याचे कारण लक्षात न घेता दोन्ही गाळे अभिहस्तांतर करण्याबद्दल प्रयोजन आहे. कारण मुख्य अधिकारी मुंबई मंडळ, वास्तु शास्त्रज्ञ, न्याय व सल्लागार अधिकारी, कार्यकारी अभियंता घाटकोपर डिव्हीजन, यांचा सुधारीत नकाशा व भुमी अभिलेखा यांचा प्रस्ताव, मान्यता प्राप्त करुन त्यानुसार पहिल्या गाळधारकाचा अभिहस्तांतरण रद्द करुन दोन्ही गाळे धारकांना अभिहस्तांतरण समसमान एकत्र धरुन प्रयोजन देण्याचे मंजूरी मुंबई मंडळ यांनी दिलेली आहे. प्रस्ताव मिळकत व्यवस्थापक क्र.३ मुंबई मंडळ यांच्याकडे पडून आहे.

जो गाळा अभिहस्तांतरण झालेला आहे त्याचे मुंबई मंडळाच्या आदेशावरुन तो रद्द करुन दोन्ही गाळे धारकांना अभिहस्तांतरण करुन मिळण्याबद्दल माहिती अर्जदारास मिळावी. अशी अपीलकाराने व्दितीय अपीलात विनंती केली आहे.

सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३९९६/०२**

**श्री.ललितराव पाटील**
**न्यू कॉलनी, मनपा झोन कार्यालय**
**१० चे मागे, नागपूर-१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अति उपायुक्त-१**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर,**
**जि.नागपूर.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर,**
**जि.नागपूर.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.संचालक (नगर रचना)**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर,**
**जि.नागपूर. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ललितराव पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

सौ.चित्रा ललितराव पाटील, न्यु कॉलनी, नागपूर यांनी दाखल केलेल्या क्र.जी.ए./क्यू ११५/ए-२८६/९३-९४ या अपीलात मनपाचे दि.१०.१०.१९९७ चे नोटीस प्रमाणे झालेल्या कार्यवाहीनुसार तात्कालीन मान. अति.उप निगम आयुक्त केकतरपुरे साहेब यांनी पारित केलेल्या

अंतिम आदेशाची प्रतीरुप प्रत व नस्तीतील संपूर्ण क्रमवार कागदपत्रांच्या प्रतीरुप प्रतींचा पुरवठा पेजनंबरसह अर्जदारास करण्यात यावा.

अपीलकाराने मागीतलेल्या कागदपत्राबाबत नस्तीचा शोध घेणे सुरु आहे. नस्तीचा शोध लागताच आपणास कळविण्यात येईल. नस्तीचा शोध लागल्यानंतर नस्तीचे अवलोकन करुन अपीलकारास आवश्यक ते कागदपत्र / माहिती यासाठी लागणारे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. अभिलेख प्राप्त झाला असल्याने कार्यालयात येउन अभिलेख निरीक्षण करुन पाहिजे असलेली माहिती घेउन जावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने संबंधीत कागदपत्रांची तपासणी केली. परंतू नस्तीमध्ये अपीलकारास पाहिजे असलेली कागदपत्र आढळून आली नाहीत. त्यामुळे अपीलकाराने दि.१५.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. संबंधीत कागदपत्राचा पुन्हा शोध घ्यावा. अपीलकारास माहिती द्यावी. उपलब्ध न झाल्यास तसे अपीलकारास कळवावे असे दि.२७.०७.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने मागणी केल्याप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action taken Report) अपीलकारास पुरविण्यात

आला असल्याचेही अपीलकाराने आयोगासमोर सांगीतले.  यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३७५९/०२**

**श्री.प्रकाश शेठ**
**११०३-सुल्सा अपार्टमेंट,**
**२५४-रिडज़् रोड,**
**मुंबई ४०० ००६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता**
**उप मुख्य अभियंता (पूल व मु.ना.वा.प) यांचे कार्यालय,**
**नवीन भांडार इमारत, १ ला मजला, डॉ.ई. मोझेस रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ब्रिजेस (शहर)**
**उप मुख्य अभियंता (पूल व मु.ना.वा.प) यांचे कार्यालय,**
**नवीन भांडार इमारत, १ ला मजला, डॉ.ई. मोझेस रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रकाश शेठ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०७.२००९ रोजी अर्ज करुन, सी.एस.टी. सबवेची अंतीम मंजूर नकाशाची साक्षांकित प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२८.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकाराने पुर्वी दाखल केलेल्या RTI अर्जाबाबत दिलेल्या उत्तराची प्रत अपीलकारास दि.०४.०९.२००९ च्या पत्रासोबत पाठविली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सी.एस.टी. सबवेची अंतीम मंजूर नकाशाची साक्षांकित प्रत मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०९९/०२**

**श्री.गोंविद विठ्ठल गायकवाड**
**१४-सी-४, प्लॉट नं.५,**
**नागरी निवारा परिषद,**
**गोरेगांव (पु), मुंबई ४०० ०६५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, खेड,**
**जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, खेड,**
**जि.पुणे. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.गोंविद गायकवाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०५.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.१२.२००६ रोजी अर्ज करुन, मौजे वाकी खुर्द, ता.खेड, जि.पुणे येथील जमिन गट क्र.२२६, सर्व्हे क्र.६०/१५ हया जमिनी संदर्भात दि.३१.०८.१९७८ रोजी महाराष्ट्र लॅन्ड रीव्हेन्यू कलम ५९ (आय.व्ही.एस) अन्वये झालेले जाब जबाब व निकालाच्या प्रतीच्या साक्षांकित नक्कलाची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संबंधीतची कागदपत्र आढळून येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.०१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. संबंधीत लिपीक व माहिती अधिकारी यांनी स्वत: संबंधीत फाईलचा शोध घेउन अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीची नक्कल अपीलकारास

तात्काळ उपलब्ध करुन द्यावी असे दि.०९.०३.२००७ रोजी आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र शोध घेउनही फाईल सापडली नाही. यामुळे अपीलकारास माहिती देता आली नसल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र शोध घेउनही सापडत नाहीत याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलादर यांनी जाणीवपूर्वक निर्णय घेउन अपीलकारास तसे कळवावे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३९९२/०२**

**श्री.सुरेश पाटील**
**घर क्र.१२, जुनी ठवरे कॉलनी, जरिपटका**
**नागपूर ४४० ०१४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाजनको महानिर्मिती,**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या,**
**२ रा मजला, प्रकाशगड, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाजनको महानिर्मिती,**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या,**
**२ रा मजला, प्रकाशगड, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुरेश पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०७.२००७ रोजी अर्ज करुन, महाजनको मधील यु.डी.सी (लेखा) कर्मचारी यांची अंतीम मंजूरी प्राप्त झालेली यादीची माहिती मिळण्याबाबत मागणी केली होती. माहिती दस्तऐवज विहित कालावधीत पुरविला नाही. यामुळे अपीलकाराने दि.२७.०७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२७.०९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास उच्चस्तर लिपीक यांच्या एकूण मंजूर पदाची माहिती पुरविण्यात यावी असे दि.२७.०९.२००७ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अर्धवट, खोटी, दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाजनको मधील कार्यरत यु.डी.सी. लेखा कर्मचारी यांची नावे दर्शविणारी यादी पुरविण्याबाबत मागणी केली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे ओदश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत दि.०६.०२.२००७ ची एकूण १८४ कर्मचा-यांच्या नावाची यादी अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०५६/०२**

**श्री.संदीप पाटील**
**ए-१/११, सहयाद्रीनगर, चारकोप,**
**कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक (मुख्यालय)**
**गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, पुनर्वसन शाखा,**
**सांगली.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संदीप पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

आपले दि.०८.०४.२००८ रोजीच्या पत्रास अनुसरुन माहिती मागणी विषयामधील मुध्दा क्र. ब ला अनुसरुन १) आपण माझे नाव सन २००२, सन २००४, सन २००५ मध्ये कोणकोणत्या खात्याकडे पाठविलेले होते याचा आपण आपल्या रजिस्टरमधील जावक क्र. व दिनांकासहीत स्पष्टीकरण द्यावे. २) तसेच आपण जर उपरोक्त वर्षात नाव पाठविलेले होते तसे मला लेखी पत्राद्वारे का कळविले गेले नाही. ३) तसेच नोकरीसाठी कोणत्या निकषाआधारे माझे नाव नाकारण्यात आले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२६.०५.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. ज्या माहितीची आवश्यकता असतांना अन्य दुसरी कुठलीतरी माहिती उत्तरवादीने दिली असल्याच्या

कारणावरुन अपीलकाराने दि.०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराचे नाव सन २००२, २००४, २००५ यावर्षी कोणकोणत्या खात्याकडे पाठविले. अपीलकारास तसे लेखी पत्राव्दारे का कळविण्यात आले नाही. कोणत्या निकषाव्दारे अपीलकाराचे नाव नाकारण्यात आले. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रकल्पग्रस्त उमेदवाराची नावे परिक्षेसाठी / मुलाखतीकरिता संबंधीत सक्षम प्राधिकरणाकडे कार्यालयामार्फत पाठविण्यात येतात. याबाबत सर्व संबंधीत उमेदवारांना कळविण्यात येत नाही असे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. त्यावेळी अपीलकाराने पत्राच्या प्रती आयोगास सादर केल्या आणि कार्यालयामार्फत प्रकल्पग्रस्त उमेदवारांची नावे ज्या सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस पाठविली आहेत त्याबाबत संबधीत उमेदवारास अवगत करण्यात आले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन उत्तरवादीने आयोगासमोर केलेले प्रतिपादन आणि अपीलकाराने सादर केलेला पुरावा यामध्ये विसंगती (Discrepancy) दिसून येते. याबाबत उत्तरवादीने अपीलकारास खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४२७९/०२**

**श्री. माने सतीश भाउराव**
**मु.पो.मदनपुरी,**
**ता.निलंगा, जि.लातूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, (माशि-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, (माशि-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.माने सतीश भाउराव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.१०.२००८ रोजी अर्ज करुन, १) शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांना त्याच शिक्षण संस्थेत कर्मचारी म्हणून नोकरी करता येते का? जिल्हापरिषद कर्मचा-यांना शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळात सदस्य म्हणून काम करता येते का? अनेक संस्थाचालक त्याच शिक्षण संस्थेत कर्मचारी म्हणून राहतात. वेळेवर नोकरी करत नसतात. कारण संस्थाचालक स्वत: असल्यामुळे त्यांना कोणीही विचारत नाही. याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) च्या व्याख्येत बसत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी दि.२३.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.११.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०९.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने

दिलेल्या उत्तराचा पुनरुच्चार करुन अपील खारिज केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शिक्षण संस्थाच्या कार्यकारी मंडळातील सदस्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आहे. आदेश पारित करणे बाकी आहे असे संचालक शालेय शिक्षण यांनी अहवाल सादर केला असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.रा.च.पाटील शालेय शिक्षण विभाग यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३४६९/०२**

**श्री. ए.एन.गिरी**
**एम.पी.वाशी ॲण्ड असोसिएट,**
**१३, श्रीनाथ भुवन,**
**२७, पिकेट क्रॉस रोड,**
**मुंबई ४०० ००२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक भूमि अभिलेख**
**मुंबई उपनगर जिल्हा,**
**१० वा मजला, प्रशासकीय इमारत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले**
**म्युनिसीपल मोटर गॅरेज कंपाउंड, सांताक्रुझ बस आगार समोर,**
**एस.व्ही.रोड, सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ए.एन.गिरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०९.२००८ रोजी अर्ज करुन, विलेपार्ले (प) येथील न.भु.क्र.४५४ या मिळकतीचे LAQ-२८४ बाबत एम.आर.क्र.३०७७(२) चे मोजणी नकाशाचे प्रमाणित प्रतिची मागणी केली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.१७.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली. दि.३०.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मोजणी नकाशाची प्रमाणित प्रतीची मागणी केली होती. नगर भूमापन अधिकारी यांनी अपीलकारास दि.०६.१०.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. संबधीत धारिका उपलब्ध नसल्याने नाकाशाची प्रत पुरविता येत नाही. धारीका उपलब्ध होताच नकला पुरविण्यात येतील असे उत्तरवादीने अपीलकारास उत्तर दिले. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांनी भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालयात समक्ष खात्री करुन नकाशा उपलब्ध नसेल तर तसे अपीलकार यांना लेखी कळवावे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. अपीलकारास आवश्यक असलेल्या नकाशाची संचिका शोधून ठेवली आहे. तथापी सदर नकाशात न.भू.क्र.४५४, ४५५ समाविष्ठ नाही. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संचिकेचे अवलोकन करावे. त्यानंतर नकाशाची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२८.०७.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत फाईल निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून फाईलचे निरीक्षण करावे. त्यानंतर उत्तरवादीने अपीलकारास निवडक कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरवाव्यात.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३५५८/०२**

**श्री. सुभाष हिरामण पाटील**
**इमारत क्र.९४/१५२३ एच आय जी म्हाडा कॉलनी,**
**बिर्ला कॉलेज जवळ, कल्याण (प),**
**जि.ठाणे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी**
**कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कला नगर, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कला नगर, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुभाष पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०४.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीत वॉम्बे योजनेअंतर्गत कोकण मंडळामार्फत बांधून पुर्ण केलेल्या साठेनगर येथील ५१, ११४, ९२ घरकुले व ६९ शौचालय स्ट्रिस, इदगाह रोड येथील १९२ घरकुले शांतीनगर, पिराणीपाडा येथील ६८ घरकुले या सर्व कामाची सुरक्षा रक्कम, रिटेन्शन मनी व इतर रकमा यांचा परतावा मिळणेबाबत.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून दि.०८.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत.

माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सुरक्षा रक्कम, रिटेन्शन मनी व इतर रक्कमा याचा परतावा मिळण्याबाबत मागणी केली होती.

राजर्षी बहुउद्‌देशीय सामाजिक सेवाभावी संस्था यांना इदगाह रोड स्लॉटर हाउस, भिवंडी येथे वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत १९२ घरकुले बांधण्याचे काम केले होते. परंतू भिवंडी येथील श्री.पैय्यंबर मेहताब शेख (बाबा) यांनी दि.०२.०२.२००९ रोजी तक्रार पत्र देउन सदर घरकुलांमध्ये शौचालय न बांधण्यात आल्याचे व सदर घरकुलांच्या बांधकामात काही त्रुटी असल्याचे कळविले होते. त्यामुळे या १९२ घरकुलांच्या कामाची व तसेच मे.राजर्षी बहुउद्‌देशीय समाजिक सेवाभावी संस्था यांनी भिवंडी येथेच इतर ठिकाणी बांधलेल्या घरकुलांच्या व शौचालयाच्या कामांची सुरक्षा रक्कम व रिटेंशन मनी परत करण्यात आली नव्हती.

तद्‌नंतर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हदिदत वॉम्बे योजनेंतर्गत कोंकण मंडळामार्फत बांधून पूर्ण केलेल्या साठेनगर येथील ५१, ११४, ९२ घरकुले व ६९ शौचालय सिटस्‌ इदगाह रोड येथील १९२ घरकुले पिराणीपाडा येथील ६८ घरकुले या सर्व कामाच्या सुरक्षा रक्कम रिटेंशन मनी व इतर रकमांचा परतावा सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीने राजर्षी बहुउद्‌देशिय सामाजिक सेवाभावी संस्था यांना करण्यात आलेला आहे.

अपीलकारास कामाची एसडी व रिटेन्शन मनी सप्टेंबर, २००९ या महिन्यात मिळाले असल्याचे अपीलकाराने दि.०३.११.२००९ रोजी फॅक्स संदेश उत्तरवादीला पाठवून कळविले. सदर

फॅक्सची प्रत उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकाराच्या प्रश्नाची सोडवणूक झाली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३४६३/०२**

**श्री. जितेंद्र रामकृष्ण जगताप**
**घर क्र.१६०/१/४, रेल्वे इमारत,**
**क्र.१७८ च्या बाजूला, तीन बंगला,**
**खार (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पूर्व वॉर्ड ऑफिस, १३७, टी.पी.एस-५,**
**दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू),**
**मुंबई ४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (ई व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पूर्व वॉर्ड ऑफिस, १३७, टी.पी.एस-५,**
**दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू),**
**मुंबई ४०० ०५५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जितेंद्र जगताप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०४.२००९ रोजी अर्ज करुन, मुंबई, मुंबई उपनगर यातील झोपडपट्टीतील घर दुकान याची सुधारणा दुरुस्तीकाम किंवा बांधकाम करण्याबाबत म्हाडा, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची कोणकोणती योजना आहे इत्यादि एकूण ३८ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास हवी असलेली माहिती ही विविध स्वरुपाची

असल्याने संबंधी जन माहिती अधिका-याकडून माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मुंबई, मुंबई उपनगरातील झोपडपट्टीतील घर दुकान यांची सुधारणा / दुरुस्तकाम किंवा बांधकाम करण्याबाबत अनुषंगीक एकूण ३८ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती फार मोठयाप्रमाणात विस्तृत स्वरुपातील असल्याने नेमकी माहिती मागीतल्यास ती उपलब्ध करुन देणे सोईलचे होईल असे उत्तरवादीने अपीलकारास सांगीतले असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच नेमकी निवडक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता संबंधीत कागदपत्राचे संयुक्तरित्या निरीक्षण आयोजित करण्यात आले. संबधीत जुन्या कागदपत्राचे निरीक्षण करतांना अपीलकारास त्याचा त्रास होत असल्याने निरीक्षण बंद करण्यात आले. अपीलकाराने मागणी मागे घेतली असे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलवरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०६९/०२**

**श्री.प्रसाद ग.धर्माधिकारी**
**छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ तालुका,**
**कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जल प्रदुषण निवारण अभियंता**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,**
**कल्पतरू पॉईट, २/३/४ था मजला,**
**सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ,**
**सायन (पू), मुंबई ४०० ०२२.**

**जन माहिती अधिकारी ,**
**जल प्रदुषण निवारण अभियंता**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,**
**कल्पतरू पॉईट, २/३/४ था मजला,**
**सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ,**
**सायन (पू), मुंबई ४०० ०२२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रसाद धर्माधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००९ रोजी ब्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.१०.२००८ रोजी अर्ज करून, पंचगंगा नदी शुध्दी करणासाठी कायमस्वरूपी विशेषबाब म्हणून राज्य व केंद्र शासनाव्दारा अथवा कोणत्याही योजनेअंतर्गत त्वरीत उपाय योजना व कार्यवाहीबाबत दिल्ली येथे बैठकीची तारिख व वेळ निश्चितीबाबत दि.१३.१२.२००७ रोजी कार्यालयाकडे आलेल्या पत्रासंबंधी मा.मंत्री महोदय पर्यावरण यांच्याकडे पाठविलेल्या तक्रारी / निवेदनावर पत्रावर केलेली कारवाई. पंचगंगा, कृष्णा नदी पात्रातील दुषीत पाण्यामुळे नदी काठच्या मानवी जन जिवनासह जीवीत व वित्त हानी होत

असल्याने उपाययोजना करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिकारी तथा जलप्रदुषण निवारण अभियंता, महाराष्ट्र प्रदुषण निवारण मंडळ, मुंबई यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पंचगंगा व कृष्णा नदीचे पात्रातील पाणी दुषीत झाल्याने जिवीत / वित्त हानी होत असल्याने उपाययोजना करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितय योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार विहित कालावधीत अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. यासाठी त्यांना जबाबदार धरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-यांविरुध्द रु.२५, ०००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई सुरु का? करण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. अपीलकारास सदर प्रकरणी १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/४०८०/०२**

**श्री.सुशील ज.गुहागरकर**
**ए-४, शिवप्रभा सोसायटी, ए.जी.जोडरस्ता,**
**साकीनाका, मुंबई ४०० ०७२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त**
**आ-३, जमा व बंदी आयुक्त तथा संचालक,**
**भूमी अभिलेख, २ रा मजला,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**पुणे-१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक**
**आ-३, जमा व बंदी आयुक्त तथा संचालक,**
**भूमी अभिलेख, २ रा मजला,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**पुणे-१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुशिल गुहागरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०१.२००७ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

तालुका निरीक्षक, भू.अ.तालुका गुहागर, जि.रत्नागिरी चे कार्यालयातील चालता क्र.२९, टिक्के-पान नं.१०, नुसार मिळकत न.भू.क्र.५७९, क्षेत्रफळ २३५ मि, घर.नं.१५१, ग्रा.पं.ता.गुहागर, जि.रत्नागिरी या मिळकतिची दि.२८.११.१९८५ ची नोटीस बजावणारा चौकशी अधिकारी श्री.स.ना.डोके, या मिळकतिची चौकशीची नोटीस खरा मालक श्री.गुहागरकर कुटुंबाला फसवून, गुंडगिरी करुन मिळकतिशी सुतराम संमंध नसलेल्या इसमावर बजावून मूळ अभिलेखातील कॉलम

नं.४, ५, ६, ७ खोटे भरुन, कॉलम नं.१३ मध्ये खोटा शेरा लिहून खोटया नावाने प्रॉपर्टीकार्ड बनविलेला IPC, CrPc अंतर्गत फौजदारी अपराध Press मधून गाजला तरिही अद्याप भू.अ.रत्नागिरी व पुणेने याची सखोल चौकशी न करता श्री.स.ना.डोके या भामटयाला का व कुठल्या कायद्यान्वये मोकाट सोडलेले आहे याची त्वरित माहिती द्यावी अशी एकूण ७ मुद्यावर माहिती मागीतली होती.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२०.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१९.०४.२००७, दि.०८.०५.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकार यांना अपील चालवावयाचे नसल्याचे नमुद करुन दि.०८.०५.२००७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, न.भु.क्र.५७९, क्षेत्रफळ २३५ मि.घ.न.१५१, ग्राम पंचायत ता.गुहागर, जि.रत्नागिरी या मिळकतीचे खोटया नावाने प्रापर्टी कार्ड बनविण्या-या भुमि अभिलेख कार्यालय रत्नागिरी श्री.स.ना.डोके व इतर यांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याचे सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. न.भु.क्र.५७९ क्षेत्रफळ २३५ मि.घ.नं.१५१ ग्रामपंचायत ता.गुहागर या मिळकतीच्या Property Card मध्ये अपीलकाराचे नाव समाविष्ठ करण्याची अपीलकाराची मागणी आहे. सदर मिळकतीच्या Property Card मध्ये अपीलकाराचे नाव समाविष्ठ न करणा-या अधिका-याविरुध्द कारवाई करण्याची अपीलकाराची मागणी आहे. सदरबाब माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत

मोडत नाही.  याकरिता अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी.  सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२०१०/३२०६/०२**

**श्रीमती. मिनादेवी पाथरे**
**ब्राईट मॅन्युफॅक्टरींग,**
**१४/के.आर.म्हात्रे मार्ग,**
**गिता धाम, टँक बंदर रोड,**
**मुंबई ४०० ०१०.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**ई विभाग कार्यालय, ३ रा मजला,**
**१० शेख्र हफिजुद्दीन मार्ग, भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**ई विभाग कार्यालय, ३ रा मजला,**
**१० शेख्र हफिजुद्दीन मार्ग, भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती.मिनादेवी पाथरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, फत्तेखान उपहारगृह, आर.आर.म्हात्रे मार्ग टंक बंदर, मुंबई समोरिल नीरमल सौचालयाच्या मंजूरी आदेशाची छायाप्रतीची मागणी केली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२२.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०४.०२.२००९ रोजी irrelevant माहिती पुरविली असल्याचे नमुद करुन दि.१९.०६.२००९ रोजी आदेश पारित केले.

त्यानंतरही अपीलकारास माहिती मिळाली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, नीरमल सौचालयाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०४.०२.२००९ रोजी irrelevant माहिती पुरविली. मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती पुरविणे आवश्यक आहे. यावरुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाची जन माहिती अधिका-यांनी अमंलबाजवणी केली नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. याप्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नसल्याने. याकरिता त्यांना जबाबदार धरून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु का? करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/३९३/०२**

**श्री.योगेश सुखदेवराव ढाकणे**
**७५८, नवीन सुभेदार ले-आउट,**
**पोस्ट अयोध्यानगर, गजानन हायस्कुलचे मागे,**
**नागपूर ४४० ०२४.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**कृषी व पदुम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.योगेश ढाकणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार उपस्थित होते. गैरतक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, आस्थापना मंडळाच्या दि.२२.०९.२००४ रोजी संपन्न झालेल्या सभेत दुग्ध व्यवसाय विकास विभागातील वरिष्ठ वर्ग-१ संवर्गातील अधिका-यांना उप आयुक्त या अतिकालीक संवर्गातील पदावर पदोन्नती देणे संबंधात घेतलेला निर्णय, संबंधीत नसतीतील उत्तारे, शेरे, तसेच तात्कालीन मा.मंत्री, दुग्ध व्यवसाय विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेश इत्यादी माहिती मागीतली होती. एकदा इतिवृत्त निर्ममित झाल्यानंतर त्यामध्ये काही गोपनीयता राहत नाही. म्हणून सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे दि.२५.०५.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही अद्याप माहिती पुरविण्यात आली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाच्या दि.२५.०५.२००९ च्या आदेशाची अमंलबजावणी केली नाही. याकरिता गैरतक्रारदारास जबाबदार धरण्यात येउन. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरुध्द शिस्तभंगाची कारवाई का सुरु करु नये याबाबत ४ आठवडयाचे आत गैरतक्रारदाराने आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५१५/०२**

**श्री. डी.एम.जाधव**
**अे-७०२, ब्ल्यू बील सेंटर ॲव्हेन्यू**
**हिरानंदानी गार्डन, पवई,**
**मुंबई ४०० ०७६.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा निबंधक**
**सामान्य प्रशासन विभाग-२३ अ,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.डी.एम.जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.२२.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, पवई येथील ए-७०२ ब्ल्यूबेल हे शासकीय निवासस्थान म्हणून वाटप करण्यात आले. ते कोणत्या निर्णयाब्दारे वाटप करण्यात आले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. तक्रारदार दि.२९.०२.२००८ रोजी शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यामुळे ए-७०२ हे शासकीय निवासस्थान त्वरित रिक्त करावे असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.०६.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविले. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने क्र.२००९/१९३०/०२ हे ब्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले होते. तक्रारदार विस्थापित आहेत काय? विस्थापीतांना पर्यायी जागा म्हणून त्यांना देण्यात आली आहे काय? याबाबतची अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास द्यावी असे

आयोगाने दि.३१.०३.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर मागणीप्रमाणे गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन आयोगाकडे क्र.५१५/०२ ही तक्रार दाखल केली.

तक्रारदार श्री.डी.एम.जाधव यांना दि.२४.१०.१९९५ च्या वाटप आदेशान्वये ए-७०२, ब्ल्यू बेल, सेंट्रल ॲव्हेन्यु, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई ७६ हे शासकीय निवासस्थान ते शासकीय सेवेत असेपर्यंत वाटप केलेले आहे. श्री.जाधव यांनी सदर निवासस्थान त्यांच्या नावावर करण्याबाबत वारंवार शासनाकडे विनंती केलेली आहे. तथापि सदर निवासस्थान शासकीय निवासस्थान असल्याने व सदर निवास्थान त्यांना शासकीय सेवेत असेपर्यंत वाटप करण्यात आले असल्याने त्यांची विनंती वारंवार नाकारण्यात आलेली आहे. याबाबत श्री.जाधव यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.४९१/२००८ दाखल केली होती. सदर याचिकेमध्येसुध्दा श्री.जाधव यांनी ते रहात असलेले निवासस्थान नावावर करण्याबाबत विनंती केली होती. उच्च न्यायालयाने दि.२५.०६.२००८ रोजीच्या आदेशान्वये श्री.जाधव यांची विनंती फेटाळून लावली आहे. श्री.जाधव हे सतत सदर शासकीय निवासस्थान नावावर होण्याबाबत प्रयत्न करीत असल्याने व सदर शासकीय निवासस्थान त्यांच्या नावावर करणे शक्य नसल्याने ते वारंवार संबंधित अधिका-याविरुध्द तक्रारी करीत असतात. श्री.जाधव दि.२८.०२.२००८ रोजी शासकीय सेवेतून निवृत्त झालेले असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने निष्कासनाची कार्यवाही सुरु केली असताना त्यांनी शहर दिवाणी सत्र न्यायालयात त्यास आव्हान दिले आहे. त्यांची विनंती न्यायालयाने फेटाळली आहे. असे गैरतक्रारदाराने लेखी अहवाल आयोगास सादर करून प्रतिपादन केले. यावरून असे दिसून येते की, सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती वेळोवेळी पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/४९६/०२**

**श्री. पुरूषोत्तम बुध्दरानी**
**दुसरा भांडूर्स कोर्ट, पहिला पास्ता लेन,**
**कोलाबा, मुंबई ४०० ००५.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ७६ श्रीकांत पलेकर मार्ग,**
**सी वार्ड विभाग, चंदनवाडी, मरीन लाईन्स,**
**मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.पुरुषोत्तम बुध्दरानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.०७.०१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणेन ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, मेसर्स कोलोंबो केश कर्तनालय नावे भाडे पावती असतांना श्री.नंदकुमार दादासाहेब थोरात, मेसर्स कोलंबो फास्ट फुड यांना अनुज्ञाप्ती (Licence) कशी देण्यात आली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने अपील क्र.२००९/३१३१/०२ हे व्दितीय अपील राज्य माहिती आयेगाकडे दाखल केले होते. अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते. आयोगाच्या आदेशानुसार माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४९६/०२ ही तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदार गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदारास मागणीनुसार माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी आयेगाच्या दि.३१.०८.२००९ च्या आदेशाचे पालन झाले असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०१.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२०१०/५३७/०२**

**श्री. नैनेश सुरेश डोळस**
**अंजली सोसा, रवि इंडस्ट्रियल कंपाउंड,**
**पाचपाखाडी-ठाणे (प) ४०० ६०२. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पदुम-८)**
**कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.गैनेश सुरेश डोळस यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.०५.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. तब्येत बरी नसल्याच्या कारणावरुन तक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकार गैरतक्रारदाराकडे दि.०६.०८.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

मुंबई पवई येथील आरे कॉलनी मधून पश्चिम द्रुतगती मार्गास जोडणा-या रस्त्यावर टोल बसवलेला आहे व प्रती फेरी १५ रुपये पावती देउन टोल वसूल केला जात आहे. हा टोल जो वसूल केला जात आहे तो टोल कधी पासून बसवला आहे व तो टोल संपुस्टात आणण्याची शेवटी अंतीम तारिख कोणती अशी एकूण ४ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती मुख्य कार्यकारी अभियंता, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव यांच्याशी संबंधीत असल्यामुळे अपीलकाराचा मुळ अर्ज पुढील कार्यवाहीसाठी त्या कार्यालयाकडे गैरतक्रारदाराने पाठविला. तसे दि.१८.०८.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव कार्यालयातील गैरतक्रारदार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.ए.डी.शेलटकर हया तक्रारीवरील सुनावणीकरिता आयोगात हजर होत्या. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याची गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तयारी दर्शविली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदार मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. शेलटकर यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०१.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**